दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शनिवार,दि.१९ एप्रिल २०२५ | वर्षे४थे | अंक२४७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के




# राज ठाकरेंचं वर्तन तालिबानी!

सदावर्तेंचा हल्लाबोल, पोलिसांत तक्रार ◆ शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेची सक्ती ◆ शाळांना टार्गेट केलं जात आहे, हे अत्यंत विदारक ◆ जातीय तेढ निर्माण करणारं कृत्य म्हणून...

## शासन निर्णयाचे दहन

राज ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी शासन निर्णयाचं दहन केलं आहे. ही कृती अत्यंत चुकीची आहे. बेकायदेशीर आहे, त्याचबरोबर, असंवैधानिक आहे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारी आहे. फेक्ल्ेस लावता येत नाही, असं न्यायालयाने सांगितलं असताना देखील त्यांच्या कार्यकर्त्यांनी फेक्ल्ेस लावले. त्यावर लिहीलं आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही. हे जातीय तेढ निर्माण करणारं कृत्य आहे. म्हणून राज ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर दाखल झाला पाहिजे, अशी मागणी यावेळी गुणरत्न सदावर्ते यांनी केली आहे. त्यामुळे आता वातावरण आणखी तापण्याची शक्यात आहे. यावर मनसेकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेची सक्ती करण्यात आली आहे, यावरून राज्यात आता वातावरण चांगलंच तापलं आहे. शासनाच्या या निर्णयाविरोधात मनसेनं आक्रमक भूमिका घेतली आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काल ट्विट करत आपली भूमिका जाहीर केली होती. त्यांनी शासनाच्या या धोरणाला विरोध केला आहे. त्यानंतर आज आता मनसे चांगलीच आक्रमक झाली आहे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी शासन निर्णयाचं दहन केलं आहे. तर दुसरीकडे या वादात आता ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी देखील उडी घेतली आहे. त्यांनी राज ठाकरे यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. राज ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर दाखल व्हावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.शाळांना टार्गेट केलं जात आहे, हे अत्यंत विदारक आहे. विद्यार्थ्यांना एक भाषा अधिक शिकायला मिळत आहे. मात्र असं असताना देखील स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर देखील कोणी एवढं तालिबानी पद्धतीनं वागलं नसेल, त्या प्रकारचं वर्तन हे राज ठाकरे यांचं आहे. हे अत्यंत दुख:द आहे. राज ठाकरेंना कायदा कळतो की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. राज ठाकरे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण न वाचता, त्यांनी स्वत:ची राजकीय पोळी भाजण्यासाठी चालवलेला हा एक घाट आहे.

## तेलगाव वीज उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरला आग

नुकसान:वीज पुरवठा ३ दिवस बंद राहण्याची शक्यता



पुण्यभूमी प्रतिनिधी

तेलगाव:येथील विज उपकेंद्रातील ५ एमव्हिए पॉवर ट्रान्सफॉर्मरला शुक्रवारी सायंकाळच्या वेळी अचानक आग लागली. या आगीमुळे तेलगावसह परिसरातील सहा ते सात गावचा वीज पुरवठा बंद झाला असुन, तीन दिवस वीजपुरवठा

बंदच राहण्याची शक्यता आहे. दरम्यान या आगीने वीज कंपनीचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी लोकनेते सोळंके कारखान्यासह वडवणी, माजलगाव येथील अग्निशमन बंब आले होते. दोन तास चालु असलेल्या आगीमुळे अकाशात धुराचे लोटच्या लोट दिसत होते.

खुपच भयानक आग होती. या संदर्भात माहिती अशी की, तेलगाव ता. धारूर येथील विज कंपनीच्या ३३ के. व्ही. वीज उपकें द्रातील ५ एमव्हिए पॉवर ट्रान्सफॉर्मरमध्ये शुक्रवार सायंकाळच्या वेळी पाच वाजण्याच्या सुमारास अचानक मोठ मोठे आवाज होऊन, या ट्रान्सफॉर्मरने काही क्षणातच पेट घेतला. तेथे ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात येण्याच्या आतच भयानक आग लागली. त्यामुळे ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना काय करावे, लक्षात येईना. त्याच वेळी वीज कर्मचाऱ्यांनी लोकनेते सुंदररावजी सोळंके करखान्याच्या तेलगाव वीज उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफार्मरला आग. अग्नीशमन बंबास पाचारण केले. हाहा म्हणता आगीने रौद्र रूप धारण केल्याने खूपच भयानक आग दिसत होती. आग पाहण्यास लोकांनी गर्दी केली होती. परंतु उपकेंद्रात » पान २ वर

## आ.संदिप क्षीरसागरांकडून पहाणी!

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी नगर पालिकेने नविन पाईपलाईन जोडणी व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. शुक्रवारी (दि.१८) रोजी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी पाईप लाईन जोडणीचे काम सुरू आसलेल्या उमरद खासला, म्हाळसजवळा येथे भेट दिली. सदरील काम वेळेत पुर्ण करून शहराला पाणीपुरवठा पुर्ववत करण्याच्या सुचना आ.क्षीरसागरांनी संबंधितांना दिल्या.

## ...म्हणाले तीच आम्हालाच त्रास द्यायची

प्रतिदावा:महिला वकिलाला मारहाण प्रकरण

पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई:तालुक्यातील सनगाव येथील सरपंच आणि इतर लोकांनी वेदम मारहाण केल्याचा आरोप महिला वकील यांनी केला होता. मात्र, आता या प्रकरणात आता दुसरी बाजू समोर आली आहे. या तरुणीला गावातील लोकांनी नाही, तर कौटुंबिक वादातून तिच्या घरच्यांनीच मारहाण केल्याचा दावा गावातील लोकांनी केला आहे. उलट तीच गावातील लोकांना त्रास द्यायची, गावकऱ्यांना शिव्या द्यायची असेही गावक-यांनी म्हटले आहे.

ध्वनी प्रदूषणामुळे आपल्याला मायग्रेनचा त्रास होत असल्याने या विरोधात तक्रार केली होती. याचा राग मनात धरून सरपंच आणि त्यांच्या कार्यकत्यांनी मारहाण केल्याचा आरोप महिला वकिलाने केला आहे. याप्रकरणी तिच्यातक्रारीवरून सरपंचासह दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर आता आरोपींच्या नातेवाईकांनी याबाबतमाध्यमांशी बोलताना महिला वकील हिने गावकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केल्याची माहिती दिली आहे.

## मुख्यमंत्री आज बीड जिल्हा दौऱ्यावर

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आज दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी येणार आहेत. घाटशीळ पारगाव ता. शिरूर ( कासार ) येथील फिरता नारळी सप्ताह सांगता समारंभास त्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. श्री देवेंद्र फडणवीस » पान २ वर

## माझा पतीच संशयी वृत्तीचा

स्पष्टीकरण:बाबासाहेब आगे खून प्रकरण

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:माझे सासु, सासरे आई-वडिलांच्या पलिकडचे आहेत. त्यांच्या जीवावरच मी सासरी राहिले. नाही तर नवऱ्याच्या जीवावर मला राहण्यासारखे नव्हते. माझा पतीच संशयी वृत्तीचा आहे, आगे खून प्रकरणातील आरोपी नारायण फपाळ याच्या पत्नीने स्पष्ट केले आहे. आगे माझ्यासाठी भावासारखा होता, आमचे कसलेच संबंध नव्हते, पतीच्या डोक्यातील संशयामुळे हे सर्व घडल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.

माजलगाव येथील बाबासाहेब आगे खून प्रकरणातील आरोपी नारायण फपाळ याची पत्नी माध्यमांशी बोलतांना म्हणाली माझ्या सासु-सासऱ्यांचा मला पाठिंबा आहे, माझा पती असा संशयी वृत्तीचा होता, याचेच म्हणून नव्हे तर गावातील कोणाचेही नाव घ्यायचा. कोणी घरी आले की तो कशासाठी घरी आला? काय काम होतं? अशा प्रकारे प्रश्न विचारुन अनेकदा संशय » पान २ वर



बोंबला

अधिकारी गुत्तेदार यांच्या संगणमताने बोगस काम

## बनकरंजा दलित वस्ती कामात बोगसगिरी

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुका येथील बनकरंजा गावांतर्गत दलित वस्ती साथी १८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर असताना या निधीचा निव्वळ गुत्तेदार आणि अधिकारी यांनी बोगस काम करून पैसे उचलण्याचा प्रकार समोर आला आहे बनकरंजा गाव अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर या दोन ठिकाणी नाली काम आवश्यक असताना अवघ्या १५ ते १० फुटामध्ये एलईडी बल्ब बसवून पैसे उचलण्याचा प्रकार सुरू आहे हा शासनाचा निधी योग्य प्रकारे वापरण्यात यावा व अधिकारी गुत्तेदार यांच्यावर चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

दलित वस्ती अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर या भागात पहिलेच एलईडी लाईट चालू



असताना पोलशेजारी पोल उभे करून निव्वळ पैसे उचलून स्वतःचं घर भागवण्यासाठी

बनकरंजा येथे दलित वस्ती अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर येथे बोगस झालेल्या कामाच्या संदर्भात केज पंचायत समिती बिडिओ समृद्धी दिवाने - काळे मॅडम यांना चौकशी करण्यासाठी फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

अधिकारी व गुत्तेदार यांनी या निधीचा चुकीचा प्रकारे वापर केल्याचा दिसून येत आहे पैसे शिल्लक राहावेत म्हणून नालिकाम न करता पोल सह एलईडी बसवण्याचे काम ग्रामपंचायत गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगणमताने झालेले आहे या शासनाच्या निधीचा योग्य वापर व्हायला » पान २ वर

## रुग्णालय प्रशासनास धरलं धारेवर

तत्पर:प्रसूतीमाता मृत्यू प्रकरणी ज्योती मेटे आक्रमक



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:मागील आठवड्याभरात जिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या तीन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही बाब वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी असून सर्वसामान्यासाठी वैद्यकीय सेवेचा आधार असलेल्या शासकीय रुग्णालयात अशी घटना घडल्याने सर्वसामान्य कुटुंबातील गोरगरीब रुग्णांनी उपचार कुठे घ्यायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. आज दि १८ रोजी सकाळी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी शासकीय रुग्णालयाला भेट देत तेथील प्रसूती विभागाची पाहणी केली आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट घेत दोषीवर वर कारवाई करण्याची » पान २ वर

## मंदिर ट्रस्ट’वर मुस्लिम चालतील?

वक्फ (सुधारणा) कायद्याला आव्हान देणा-या याचिकेवर बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. वक्फ कायद्यात सुधारणा करताना वक्फ बोर्डावर बिगर मुस्लिम सदस्यांची नेमणूक करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे आता हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लिम व्यक्तीची नेमणूक करणार का, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. संजयकुमार आणि न्या. के. व्ही. विश्वनाथ यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी सुरू आहे.

वक्फ कायद्याविरोधात सुमारे १०० याचिका दाखल झाल्या असून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली तर केंद्र सरकारच्या वतीने महाधिवक्ता तुषार मेहता युक्तिवाद करत आहेत. वक्फ बोर्डावर बिगर मुस्लिम सदस्यांची नेमणूक करण्याबाबत कपिल सिब्बल व अभिषेक मनु सिंघवी यांनी प्रश्न उपस्थित केले. यापुढे हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लिम व्यक्तीला घेतले जाणार का, सरकारची यावर काय भूमिका आहे, असा थेट प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने मेहता यांना विचारला. केंद्र सरकारने नुकतेच संसदेच्या दोन्ही सभागृहांत मंजूर केलेल्या आणि राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केल्याने कायद्यात रुपांतर झालेल्या वक्फ सुधारणा कायद्याला आव्हान देणा-या दहा याचिकांवर सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुनावणी झाली. या प्रसंगी याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तिवादानंतर न्यायालयाने हिंदू देवस्थानांच्या ट्रस्टवर मुस्लिम सदस्य नेमणार का, असा सवाल केंद्र सरकारला केला. वक्फ सुधारणा कायद्याला विविध धार्मिक संस्था, विविध पक्षांचे खासदार, विविध राजकीय पक्ष आणि अनेक राज्य सरकारांकडून आव्हान देणा-या सुमारे १०० याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. त्यापैकी दहा याचिकांवर बुधवारी सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सरकारच्या निर्णयावर कडाडून हल्ला चढवला. अशा प्रकारे मुस्लिम अल्पसंख्याकांच्या वक्फ सुधारणा कायद्यात करण्यात आलेली तरतूद भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २६ चे उल्लंघन करणारी आहे. अनुच्छेद २६ अन्वये घटनेने देशातील सर्व धर्मियांना धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले आहे. वक्फ बोर्डावर गैरमुस्लिम सदस्यांची नियुक्ती करणे धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच करणारे आहे असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला. सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने हिंदू देवस्थानांची व्यवस्था पाहणा-या न्यासांवर मुस्लिम सदस्यांची नियुक्ती करणार का, असा सवाल करत केंद्र सरकारला याबाबत भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले. या दहा याचिकांमध्ये एमआयएमचे नेते खासदार असदुद्दीन ओवेसी, दिल्लीतील आम आदमी पार्टीचे आमदार अमानुतुल्लाह खान, जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष अर्शद मदनी, ऑल केरल जामियतुल उलेमा, अंजुम कादी, तैयाब खान सलमानी, मोहम्मद फजनुर्रहीम आणि खा. मनोज कुमार झा यांनी दाखल केलेल्या याचिकांचा समावेश आहे.

यापैकी काही याचिकाकर्त्यांनी वक्फ सुधारणा कायदा बेकायदेशीर असून तो रद्द करावा अशी मागणी केली आहे. तर काही याचिकाकर्त्यांनी हा कायदा मनमानी आणि मुस्लिमांबाबत भेदभाव करणारा असल्याचे सांगत कायद्याच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्याची मागणी केली आहे. असदुद्दीन ओवेसी यांनी वक्फ सुधारणा कायदा हा देशातील अल्पसंख्याक मुस्लिमांना घटनेने दिलेले संरक्षण हिसकावून घेणारा आहे, असा आरोप केला आहे. वक्फच्या मालमत्तांना कायद्याने आणि घटनेने दिलेले संरक्षण काढून घेताना अन्य धर्मांसाठी मात्र संरक्षण कायम ठेवणे ही वागणूक मुस्लिमांवर अन्याय करणारी आहे, असे मत याचिकेद्वारे मांडले आहे. ‘आप’चे अमानुतुल्ला खान यांनी अशी भूमिका मांडली आहे की, वक्फ बोर्डावर अन्य धर्मीय सदस्यांची नियुक्ती करणे हे घटनेतील अनुच्छेद १४ चे उल्लंघन आहे. या कायद्याचा धार्मिक मालमत्ता व्यवस्थापनाशी तर्कसंगत असा काहीही संबंध नाही.

दुसरीकडे भाजपाची सत्ता असलेल्या किंवा भाजपा सत्तेत सहभागी असलेल्या हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, छत्तीसगड आणि उत्तराखंडसहित ७ राज्यांनी वक्फ सुधारणा कायद्याच्या समर्थनार्थ याचिका दाखल केल्या आहेत. वक्फ सुधारणा कायदा योग्य असून तो रद्द केला जाऊ नये, अशी मागणी या राज्यांनी केली आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांनी प्रामुख्याने वक्फ बोर्डाची स्थापना, जुन्या वक्फ मालमत्तेची नोंदणी, बोर्ड सदस्यांमध्ये बिगर मुस्लिमांचा समावेश आणि वादांचे निराकरण यावर युक्तिवाद केला आहे. या संदर्भात बोलताना कपिल सिब्बल म्हणाले, आम्ही त्या तरतुदीला आव्हान देतो ज्यामध्ये म्हटले आहे की, केवळ मुस्लिमच वक्फ बोर्डाची स्थापना करू शकतात. गत ५ वर्षांपासून इस्लाम धर्माचे पालन करणारे लोकच वक्फ निर्माण करू शकतात असे सरकार कसे म्हणू शकते? शिवाय, मी मुस्लिम आहे की नाही आणि म्हणून वक्फ निर्माण करण्यास पात्र आहे की नाही हे राज्य कसे ठरवू शकते? जुन्या वक्फ मालमत्तेच्या नोंदणीबद्दल सिब्बल म्हणाले, ते इतके सोपे नाही. वक्फची निर्मिती शेकडो वर्षांपूर्वी झाली. आता ते ३०० वर्षे जुन्या मालमत्तेचे वक्फ डीड मागतील. इथेच समस्या आहे. केंद्राच्या वतीने तुषार मेहता म्हणाले, वक्फची नोंदणी नेहमीच अनिवार्य असेल. १९९५ च्या कायद्यातही हे आवश्यक होते. सर्वोच्च न्यायालयाचा सवाल असा की, अनेक जुन्या मशिदी आहेत. १४ व्या आणि १६ व्या शतकातील अशा मशिदी आहेत ज्यांची नोंदणीकृत विक्री कागदपत्रे नाहीत, अशा मालमत्तांची नोंदणी कशी केली जाईल? विविध पक्ष आणि संघटनांनी वक्फ सुधारणा कायद्याला स्थगिती देण्याची मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिला असून, न्यायालयाने या कायद्याच्या विरोधात होणा-या हिंसेबाबत चिंता व्यक्त केली आहे. या कायद्याला स्थगिती आणण्यासाठी दबाव टाकण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला जाऊ नये असेही न्यायालय म्हणाले.

# परळीत ईद मिलन, सद्भावना संमेलन

## विश्वातील साऱ्या मानवांचे नाते हे रक्ताच्या नात्याइतकेच घट्ट अन् जवळचे

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळीत: येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील विशेष अतिथी विश्राम गृह येथे संपन्न झालेल्या ईद मिलन तसेच सद्भावना संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून मुजीब देवनिकर सर, प्रमुख पाहुणे म्हणून परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर, भरत महाराज गुट्टे, सदभावना मंच परळीचे अध्यक्ष प्रा.एम.एल.देशमुख, हजरत मौलाना तैमूर मिल्ली साहेब, सय्यद इफ्तेखर सर (जिल्हा अध्यक्ष जमाते हिंद), या सह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

उत्साहपूर्ण संपन्न झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे सामाजिक सलोख्यासाठी घेतलेला हा कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगत समाजातील गढूळ वातावरण सलोख्याचे होण्यासाठी घेण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. माणसाने माणसांमधील स्वतःचे अस्तित्व शोधायचे आहे, हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे भरत महाराज गुट्टे म्हणाले. सद्भावना संमेलनास आलेल्या सर्वांचे स्वागत सय्यद इफ्तेखर सर यांनी आपल्या मनोगतातून केले.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते मुजीब देवणीकर सर यांनी सांगितले की आज साऱ्या मानवा करिता समाज टिकवण्याकरिता व देश टिकवण्याकरिता सद्भावनेचे फार महत्त्व आहे. सद्भावने शिवाय कोणताही देश प्रगती करू शकत नाही. यासाठी त्यांनी पैगंबर यांचे उदाहरणही दिले. ईद साजरी करण्यामागचा उद्देश रमजान रोजा याचा इतिहास व वास्तविकताही त्यांनी वर्णन केली. साऱ्या विश्वातील मानवांचे मूळ एक पुरुष आणि एक स्त्री आहे. या नात्याने विश्वातील साऱ्या मानवांचे नातं हे रक्ताचे नातं असल्याचंही त्यांनी सांगितले. माणसाने आपल्या जीवनाचा उद्देश जाणला पाहिजे आपला निर्माण करता या जगात कर्म करण्यासाठी आपणाला पाठवलं आहे त्याला जाणलं पाहिजे आणि त्याची आज्ञाही पाळली पाहिजे. माणसाला नीतिमान बनवण्याचं कार्य रमजान महिना करतो म्हणून या रमजान महिन्यात मुस्लिम बांधव सदाचरण करण्याचा पूर्ण प्रयत्न करतात. उद्या मरणोपरांत जीवनात आपल्या जीवनातील प्रत्येक कर्माचा जाब अल्हासमोर द्यावा लागेल ही जाणीव ही त्यांनी करून दिली. परळी शहरातील हास्तुत्य उपक्रम इतरत्र सर्वत्र व्हावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास समाजातील सर्व घटकातील बांधवांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आभार शेख साबेर सर यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी शिरखुर्मा चा स्वाद घेतला.

# शॉर्टसर्किटमुळे शेडनेटला आग

## शेतकऱ्याचे ३० लाखाचे नुकसान

पुण्यभूमी प्रतिनिधी

शिरूर : शेतामध्ये पिक घेण्यासाठी उभारण्यात आलेले शेडनेट आगे मध्ये जळून खाक झाल्याची घटना तालुक्यातील खालापूर या गावांमध्ये शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास घडली असून, या आगीमध्ये शेतकऱ्यांचे ३० लाख रुपये किमतीचे शेडनेट, ड्रिप्स, फवारणी करण्यासाठी लागणारे विविध साहित्य जळून खाक झाले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी येथील प्रगतशील शेतकरी बळीराम मारुती उगले यांनी आपल्या शेतामध्ये विविध पिके घेण्यासाठी गेल्यावर्षीच पोखरा योजनेअंतर्गत सुमारे ३० लाख रुपये खर्च करून गट नंबर ७३४ मधील एक एकर मध्ये शेडनेटची उभारणी केली होती. यामध्ये झेंडू,टोमॅटो, ढोबळी मिरची,वांगी, टरबूज अशी विविध पिके घेत त्यांनी खालापुरी पंचक्रोशीत शेतकऱ्यापुढे एक नवा आदर्श निर्माण केला होता. या शेडनेट ग्रहाच्या लगतच काही अंतरावरून विद्युत वितरणाची विद्युत वहिनी तारा गेलेल्या आहेत. या तारे वरती शॉर्टसर्किट होऊन शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या दरम्यान आगीच्या ठिणग्या जमिनीवरती पडल्या आणि वाळलेल्या गवताने पेट घेतला. इथूनच काही




पावलांच्या अंतरावर बळीराम उगले या शेतकऱ्यांची शेडनेट होते. या शेडनेटला अगदी काही वेळातच आग लागली आणि पाहता पाहता शेडनेट ग्रह अगदी जळून खाक झाले. शेडनेटमध्ये अंथरलेले ठिबकचे पाईप, पिकांना फवारणी करण्यासाठी लागणारे स्पिंकलर, विद्युत मोटार पाईप, यासाठी लागणाऱ्या महागड्या पाण्याच्या टाक्या जळून खाक झाल्या आहेत सुमारे या आगीमध्ये तीस लाखाच्या वर नुकसान झाल्याची माहिती शेतकरी बळीराम मारुती उगले यांनी दैनिक राज्य लोकतंत्र ला देताना सांगितले आहे. बळीराम मारुती उगले या शेतकऱ्यांचे शॉर्टसर्किटमुळे सुमारे ३० लाखाचे नुकसान झाले. शेडनेटला लागलेल्या आगीमुळे झालेल्या शेतकऱ्याच्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी तहसील कार्यालय, कृषी कार्यालय, विद्युत वितरण कंपनी या सर्वांना माहिती देऊनही केवळ लाईनमन भोसले व कृषी सहाय्यक हनुमान सानप यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली मात्र झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अद्याप वेळ मिळाला नाही. तर तलाठी महोदय मी बाहेरगावी असल्याचे सांगून वेळ मारून नेत असल्याचा आरोप शेतकरी बळीराम उगले यांनी केला आहे. खालापुरी येथील शेतकरी बळीराम मारुती उगले या शेतकऱ्याचे शेडनेट ग्रहाला आग लागून मोठे नुकसान झाल्याची माहिती आमच्या कर्मचाऱ्याकडून मला मिळाली आहे. तसे त्यांनी फोटो हे पाठवले आहेत. या ठिकाणी नक्की कशामुळे लागली याचा पंचनामा होणे बाकी आहे. मी आजारी असल्याच्या कारणामुळे आज तिकडे येऊ शकलो नाही. मात्र लवकरच अधिकारी कर्मचाऱ्याला घटनास्थळी पाठवून पंचनामा करून शॉर्टसर्किटमुळे जर ही आग लागली असेल तर तसा प्रस्तावही दाखल करण्यात येईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अभियंता निकम यांनी दिली आहे.

## पान एक वरून

**तेलगाव वीज उपकेंद्रातील पॉवर**

ऑईल व इतर स्फोटक पदार्थ असल्याने आगीच्या जवळ जाणे ही धोकादायक होते. फोन करताच कारखान्याचा अग्नीशमन बंब काही वेळात घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करत होता. तसेच विज कर्मचारी आग आटोक्यात आणण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करत होते. मात्र आग आटोक्यात येत नव्हती. आगीमुळे आकाशात धुरांचे लोटच्या लोट दिसत होते. जवळपास दोन तास आग चालूच होती. आगीमुळे तेलगावसह परिसरातील अनेक गावचा विज पुरवठा बंद करण्यात आला होता. तर तेलगाव व परिसरातील नित्रुड, भोपा, बाभळगाव, भोपा, कोथिंबीरवाडी परिसरातील अनेक तांडे येथील वीज पुरवठा किमान तीन दिवस बंद राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर या आगीने विज कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. दरम्यान या संदर्भात विज कंपनीचे बीडचे अधिक्षक अभियंता यांना दोन वेळा फोन केला परंतु त्यांनी फोन उचलण्याची तसदी घेतली नसल्याने ग्रामस्थांतून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

**मुख्यमंत्री आज बीड जिल्हा**

यांच्या बीड जिल्हा दौऱ्याचा कार्यक्रम पुढील प्रमाणे, १०:५५ वाजता हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर येथून घाटशीळ पारगाव कडे प्रयाण. ११.२० वाजता घाटशीळ पारगाव येथील हेलिपॅड येथे आगमन. ११.२५ वाजता मोटारीने घाटशीळ पारगाव येथील कार्यक्रमासाठी प्रयाण ११.३० वाजता सप्ताह सांगता समारंभ स्थळी आगमन. दुपारी १२.३० वाजता घाटशीळ पारगाव येथून हेलिपॅड कडे प्रयाण. १२.४० वाजता हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजी नगर विमानतळाकडे प्रयाण.

**माझा पतीच संशयी**

घ्यायचा. पतीचा मला खूप त्रास होता. दारु पिऊन यायचा, मला शिवीगाळ करायचा. आगे हे फोटोग्राफर होते त्यावेळी त्यांच्याकडे एकदा मुलीचे फोटो काढले होते, तोच संशय माझ्या पतीच्या डोक्यात होता. आगे आणि पतीचे कधी बोलणे झाले नाही. या विषयावर घरात सुद्धा कधी बोलणं झालं नाही. माझ्या पतीला नातेवाईकांसह गावातील लोकांनी दारुविषयी वारंवार विनवून सांगितले परंतु त्यांच्यात सुधारणा झाली नाही. आगे यांनी अनेकदा आमच्या भांडणात मध्यस्थी केली, याचाही राग पतीच्या डोक्यात होता. आगे यांची हत्या केवळ पतीने घेतलेल्या संशयावरुनच झाली. आगे शेजारीच रहात होते, ते माझ्या भावाप्रमाणे होते असेही आरोपी नारायण फपाळ याच्या पत्नीने माध्यमांना सांगितले.

**बनकरंजा दलित वस्ती**

पाहिजे मात्र काही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचा निधी जनतेच्या उपयोगी न येता स्वतःचे घर भरण्यासाठी या निधीचा उपयोग केला जात असल्याचं बनकरंजा येथील साठे नगर व बौद्ध नगर या भागातील कामावरून दिसून येत आहे याकरिता अधिकारी व गुत्तेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ते कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे

**रुग्णालय प्रशासनास**

मागणी करत रुग्णालय प्रशासन धारेवर धरलं. छाया गणेश पांचाळ रा. अंबीलवडगाव, ता. बीड यांना जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. प्रसुती झाल्यानंतर काही वेळातच अचानक रक्तस्त्रावचा त्रास सुरू झाला. याबाबत नातेवाईकांनी नर्सला माहिती दिली. पण त्यांनी ऐकून न घेता उद्धट भाषा वापरत दुर्लक्ष केले. यानंतर मातेचा मृत्यु झाला. ही घटना जिल्हा रूग्णालयात रविवारी (दि. १३) पहाटे घडली. याप्रकरणाला मयत मातेच्या नातेवाईकांनी डॉक्टर आणि नर्स जबाबदार असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आणखी दोन महिला प्रसूतीसाठी दाखल झाल्यानंतर मृत्युमुखी पावल्या या घटनेमुळे शिवसंग्राम अध्यक्ष डॉक्टर ज्योती मेटे यांनी आक्रमक पवित्रा घेत आज सकाळी जिल्हा रुग्णालयाला भेट दिली यावेळी त्यांनी प्रसूती विभागाची पाहणी केली आणि रुग्णालय प्रशासनाला जाब विचारत धारेवर धरले.

## पान सहा वरून

**बुद्ध जगातले पहिले**

वाघमारे हे होते, तर सूत्रसंचलन डॉ सिद्धार्थ जगतकर यांनी केले व शेवटी उपस्थितांचे आभार अजय गंडले सर यांनी मानले. यावेळी परळी शहरातील बौद्ध उपासक-उपासिका यांनी कार्यक्रमाला उत्सफूर्त प्रतिसाद दिला.

**व्यंकटेश बालाजी मंदिराचा**

सकाळी १०.५६ मुहूर्तावर आयोजित करण्यात आला आहे यानंतर महाप्रसाद दुपारी १२ ते ४ या वेळेत होईल या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री बालाजी मंदिर देवस्थान ट्रस्ट कळंब व समस्त श्री बालाजी भक्तगण कळंब यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**...म्हणून विमा मिळण्यास वेळ**

नेते वसंत मुंडे यांनी केला. पिक विमा संदर्भात शेतकऱ्यांसाठी एनडीआरएफ व एस डी आर एफ निकषचे पालन खाजगी पिक विमा कंपन्या करीत नाहीत. न्यायालयाचे शासनाला आदेश पीक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्यासंदर्भात दिलेले असतानाही शेतकऱ्याला पिक विमा वाटप करण्याबाबत कंपन्या अडथळे करीत असल्यामुळे त्रिमूर्ती सरकारने नियमानुसार खाजगी पिक विमा कंपन्या काळा यादीत टाकण्याचे आदेश काढावेत अशी मागणी शासनाकडे कॉंग्रेसनेते वसंत मुंडे यांनी केली आहे.

**’युवा संघर्ष निर्धार’**

लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे वाटचाल करु पाहणा-या या निद्रिस्त सरकारला जागे करण्यासाठी पुण्यात दि. २० एप्रिल रोजी होत असलेल्या युवा संघर्ष निर्धार परिषदेला युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे. असे आवाहन रासपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. शिवाजी शेंडगे यांनी केले आहे.

**एसएफआयचे अधिवेशन**

शाळा वाचवण्यासाठी लढा तीव्र करा, विद्यार्थिनी व महिला अत्याचार विरोधी लढा तीव्र करा, जनविरोधी जनसुरक्षा विधेयकविरोधी लढा तीव्र करा यासहित विविध ठराव एकमताने या अधिवेशनात पारित करण्यात आले.यावेळी आगामी काळात जिल्ह्यात संघटनेची बांधणी करण्यासाठी व संघटना वाढीसाठी १८ सदस्यांची नवीन बीड जिल्हा कमिटी निवडली. यामध्ये एसएफआयचे नवनिर्वाचित जिल्हा अध्यक्ष म्हणून सत्यजित मस्के यांची तर जिल्हा सचिव म्हणून पवन चिंचाणे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून अंकुश कोकाटे तर सहसचिव म्हणून सारंग भगत यांचीआणि सचिवमंडळ सदस्य म्हणून आरती साठे, लहू खारगे यांची निवड करण्यात आली. जिल्हा कमिटीचे सदस्य म्हणून हमीद शेख , संकल्प साठे, पायल कोळी, हर्षद डाके, प्रथमेश उफाडे, नैतिक आर्दड, रामेश्वर जाधव, आनंद सक्राते, यांची निवड करण्यात आली. नवीन जिल्हा कमिटीचे अभिनंदन करण्यात आले. संघटनेचे माजी जिल्हा सचिव संतोष जाधव यांनी संघटनेतून निवृत्ती घेतली. त्यांनी त्यांचा अनुभव सांगितला. अधिवेशन समारोपप्रसंगी नूतन जिल्हा अध्यक्ष व जिल्हा सचिव यांनी मनोगत व्यक्त करत आगामी काळात जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे प्रश्न नेटाने संघटनेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी व जिल्हाभरामध्ये संघटना अधिक भक्कम करण्याचा निर्धार व्यक्त केला. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी एसएफआय माजलगाव तालुका कमिटीचे संदीप इंगळे, शरद नांदे, यशवंत सक्राते, सुहास झोडगे, फारूक सय्यद, आनंद सक्राते, हर्षद डाके, अजय डाके, ऋषिकेश सोनवणे, अक्षय पोहरे, प्रणव खरात, अभिजित जाधव, अविनाश जाधव, तुकाराम निरगुणे, रवि राठोड, आदींनी अथक परिश्रम घेतले.

**केजमध्ये कृषी विद्यालय**

यावे अशी मागणी म राठवाडा जनता विकास परिषद केज शाखेच्या वतीने करण्यात आली. केज तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे.यावेळी उपस्थित पत्रकार हनुमंत भोसले, रामदास तपसे, चंद्रकांत पाटील, धनंजय कुलकर्णी, घाडगे सर उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printex, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## भिवंडीत क्षयरुग्णांना फूड बास्केट वाटप

**ठाणे :** जिल्हा क्षयरोग अधिकारी ठाणे डॉ. ए. एस. मुंजाळ यांनी निक्षय मित्र बनविण्याकरिता आयुक्त, रंगा नायक, आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेऊन निक्षय मित्र संकल्पना सविस्तरपणे सांगितली. त्याच आनुषंगाने



त्यांनी ३ रुग्ण ६ महिन्यांकरिता दत्तक घेतले असून दि. १७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा क्षयरोग केंद्र, ठाणे कार्यालय अंतर्गत भिवंडी येथील ३ क्षयरुग्णांना ६ महिन्यांचे फूड बास्केट वाटप करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त यांनी सदर फूड बास्केट दिले आहेत. तरी समाजातील सामाजिकदृष्ट्या सक्रिय व्यक्तींनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात आपला सहभाग वाढवून ठाणे जिल्हा तसेच महाराष्ट्र आणि भारत क्षयरोग मुक्त करण्यास आपले योगदान द्यावे असे आवाहन आयुक्त यांनी सर्वांना केले आहे.

### वेचक

## कल्याण पूर्वेत साकारली बौद्धगया मंदिराची प्रतिकृती

**कल्याण :** विश्वरत्न, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती गणेशवाडी, कल्याण (पूर्व) येथे मोठ्या थाटामाटाने व उत्साहाने



साजरी करण्यात आली. मी कल्याणकर सामाजिक संस्थेतर्फे यावेळी बिहार येथील बौद्धगया मंदिर (महाविहार) याचा सुंदर देखावा साकारण्यात आला व रॅलीमधील बांधवांसाठी मोफत पाणीवाटप करण्यात आले. साकारण्यात आलेला देखावा कांता लहाने, किशोर देसाई, प्रशांत मोरे, योगेश बारसकर, अतुल दहिवडे, दिलीप पाटील, प्रथमेश जाधव, शशी सूर्यवंशी, चेतन नायडू, पंकज निकम यांनी मोठी मेहनत घेऊन तयार केला असल्याची माहिती मी कल्याणकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक नितीन निकम यांनी दिली.

## केडीएमसी सफाई कर्मचाऱ्यांना खेळांद्वारे विरंगुळा



**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या हजेरी शेड सफाई कामगारांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जंयती तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५व्या जयंतीनिमित्त कामगारांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मोठ्या उत्साहात महिला कर्मचारी तसेच पुरुष कर्मचारी यांनी सहभाग घेतला. नेहमीच ताण तणावाच्या जीवनापासून एक दिवस मुक्त होऊन लहानपणाच्या आठवणींना उजाळा देऊन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धा संपन्न करण्यासाठी भीमदास जाधव, हरीश परमार, संतोष गायकवाड, मिलिंद भालेराव, तसेच मुख्यालय हजेरी शेडचे संपूर्ण कर्मचारी वर्ग यांनी खूप मेहनत घेतली.

## अमली पदार्थांसह दोन महिलांना अटक



**भाईंदर :** भाईंदर पूर्वेकडील मोतीलाल नगर आणि मीरा रोडच्या हाटकेश भागातून पोलिसांनी २२ कोटी ३३ लाख रुपये किमतीचा कोकेन अमली पदार्थ जप्त केला असून एक परदेशी नागरिकांसह दोन महिलांना अटक केली आहे. येथे एका महिलेकडे मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ विक्रीसाठी आल्याची माहिती पोलिसांनी मिळाल्यानंतर पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या पथकासह मोतीलाल नगर येथे धाड टाकली असता सबिना शेख या महिलेच्या घरी १७ कोटी ७४ लाख ५० हजार रुपयांचा १२ किलो ८३० ग्रॅम वजनाचे कोकेन तसेच ८० हजार रुपये रोख सापडले. कोकेन मीरा रोडच्या हाटकेश भागातील एक नायजेरियन व्यक्तीकडून विक्रीसाठीची माहिती तिने दिली. त्यावरून पोलिसांनी त्या परदेशी व्यक्तीकडे छापा टाकला असता त्याच्याकडे ३ कोटी ९० लाख ७२ हजर रुपये किमतीचे कोकेन तसेच रोख रक्कम १ लाख ४ हजार सापडले. पोलिसांनी एन डी पी एस कायद्यानुसार दोन महिला व एक पुरुष यांना अटक केली आहे.

## मृत्यूनंतरही 'त्याने' दिले गरजूंना जीवनदान

**कल्याण :** मेंदूत रक्तस्राव झाल्याने डॉक्टरांनी मृत घोषित केलेल्या वासिंदमधील प्रवीण चन्ने यांचे अवयवदान करण्यात आले आहे. या निर्णयातून चन्ने परिवाराने ग्रामीण भागातील जुनाट रूढी-परंपरांना दूर ठेवून ग्रामस्थांकरिता एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. कित्येक वर्षांपासून वासिंदमध्ये राहणाऱ्या ४४ वर्षीय प्रवीण रिलायन्स जिओमध्ये नोकरी करत होता. अचानक रक्तदाब वाढल्याने त्याला डोंबिवलीतील एम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले; परंतु मेंदूत रक्तस्राव झाल्याने डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. डोंबिवलीतील एम्स हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी अवयवदानाबाबत रुग्णाच्या कुटुंबीयांचे समुपदेशन केले. प्रवीणचे वडील अशोक चन्ने यांनी काळजावर दगड ठेवत मुलाच्या आठवणी जिवंत ठेवण्यासाठी अवयवदानाचा निर्णय घेतला. एम्स हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी अवयवदानाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटल, डी. वाय. पाटील, पुणे, नानावटी हॉस्पिटल, फोर्टिज हॉस्पिटल, मुलुंड येथील गरजू रुग्णांसाठी प्रवीणचे अवयव देण्यात आले. यात किडनी, फुप्फुस, डोळे, इतर अवयव दान करण्यात आले. चन्ने परिवाराने स्वतःवर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना कित्येक कुटुंबाला आनंद देऊन समाजापुढे नवा आदर्श निर्माण केला आहे.

# कल्याण-डोंबिवली क्षेत्रात ४६२ इमारती धोकादायक

**१६९ अती धोकादायक ; इमारतींवर महापालिका चालवणार बुलडोझर**

**२९३ धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना बजावण्यात आली नोटीस**

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने शहरातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण सुरू केले आहे. या सर्वेक्षणात ४६२ इमारती धोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. धोकादायक इमारतींपैकी २९३ धोकादायक आणि १६९ अती धोकादायक इमारतीची इगतवारी केली आहे. सन २०२४-२०२५च्या सर्वेक्षणानंतर पुढील दोन महिन्यांत धोकादायक इमारतींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

महापालिका प्रशासन अति धोकादायक इमारती पाडण्याबाबत तसेच, धोकादायक इमारती रिकामी करण्यासाठी नोटिसा बजावण्याचे काम केले असून, १६९ अतिधोकादायक इमारतींपैकी काहीं इमारतींमध्ये राहणारे लोक भीतीच्या छायेत जगत आहेत. कारण त्यांच्या पुनर्बांधणीत अडथळे येत आहेत. ज्यामुळे त्यांना त्यांचे घर सोडायचे नाही. त्याच वेळी, पावसाळ्यात मुसळधार पावसात अत्यंत धोकादायक इमारती कधीही कोसळू शकतात, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी होऊ शकते.



त्याचबरोबर २९३ धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना इमारती रिकामी करण्यासाठी महापालिकेकडून नोटिसा बजावल्या जात आहेत.

स्ट्रक्चर ऑडिट अवाहालाअंती सी १-अती धोकादायक इमारत, सी २ धोकादायक इमारत अशी इगतवारी केली जाते. अतिधोकादायक इमारतीतील रहिवाशांना तत्काळ इमारत खाली करणे बाबत नोटीस दिल्या जातात., तर सी २ मध्ये धोकादायक इमारतीमध्ये ए वर्गात धोकादायक इमारतीतील रहिवासींना खाली करून इमारत दुरुस्त केली जाऊ शकते. बी वर्गात धोकादायक इमारतीमधील रहिवासी खाली न करता अधिकृत इमारतीची दुरुस्ती केली जाऊ शकते. अति धोकादायक इमारतीचे पाडकाम करण्यासाठी तळ मजला अधिक ३ मजले इमारतीच्या पाडकामास यंत्र सामग्री आणि मन्युषबळ यासाठी अंदाजे आठ ते नऊ लाख खर्च येतो आणि संदर्भात इमारत मालकांनी हा खर्च करावयाचा असतो. मालकाने पाडकाम खर्च पूर्तता न केल्यास प्रशासन बोजा म्हणून खर्च त्या जमिनीवर टाकते आणि पुढे त्या जागेत नवीन बांधकाम परवानगी देण्यापूर्वी बोजा वसूल केला जातो.

अशी माहिती सूत्रांकडून मिळाली असून अति धोकादायक इमारतीमधील रहिवासी असताना संभाव्य परिस्थितीत इमारतीचा भाग कोसळला, तर तात्पुरता स्वरूपात प्रशासन त्या रहिवाशीची सोय शाळा वैगेरे ठिकाणी करते. अतिधोकादायक इमारत पाडल्यानंतर इमारतीच्या पाडकाम डेब्रिजची विल्हेवाट देखील संदर्भात मालकाने करणे अपेक्षित असते. तसे न झाल्यास प्रशासन पाडकाम डेब्रिजचा वापर मनपाच्या कामाच्या भरणीसाठी करते असे समजते, तर काही ठिकाणी भाडेकरू रहिवासी यांना बाहेर काढण्यासाठी विकासक महापालिकेला हाताशी धरून इमारत धोकादायक ठरवून खाली करवून घेत असल्याचा आरोप देखील रहिवाशांकडून केला जात आहे.

"अतिधोकादायक इमारती, धोकादायक इमारती बाबत पावसाळ्यापूर्वी सर्व्हेक्षण करून प्रशासन रहिवाशांना नोटीस बजावते. अति धोकादायक इमारती बाबत इमारत खाली करून तातडीने पाडण्याबाबत नोटीस दिली जाते. जेणे करून संभाव्य जीवितहानी टाळली जाऊ शकते. तरी अतिधोकादायक इमारतीमधील रहिवाशांनी इमारत खाली करून प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन उप आयुक्त अवधूत तावडे यांनी केले आहे.

### आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्याकडून पाहणी दौरा

## मान्सूनपूर्व नालेसफाईसाठी मीरा-भाईंदर महानगरपालिका सज्ज



◆ **भाईंदर (प्रतिनिधी) :**

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा. प्र. से.) यांनी पावसाळ्यापूर्वीच्या नालेसफाई कामाचा आढावा घेण्यासाठी शहरातील डी-मार्ट मागील नाला, रेल्वे समांतर नाला, मीरा रोड स्मशान भूमिलगत नाला याठिकाणी पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, उप स्वच्छता अधिकारी प्रकाश पवार आणि स्वच्छता निरीक्षक अनिल राठोड उपस्थित होते.

मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण २०८ कच्चे/पक्के नाले आहेत. सदर कामी जे.सी.बी. मशिन, पोकलन मशीन, बोटसह पोकलन मशिन, हायड्रा मशीन, डंपर, टोरस व मनुष्यबळ आवश्यकतेनुसार उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील पावसाचे पाणी वाहून नेणारे कच्चे/पक्के नाले योग्यरितीने साफ होणे आवश्यक आहे. सदरचे कच्चे / पक्के नाले सफाईची कामे मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनानुसार संबधित प्रभागातील कनिष्ठ अभियंता व संबधित वॉर्ड मधील स्वच्छता निरीक्षक यांच्या देखरेख व नियंत्रणाखाली दिनांक २० एप्रिल २०२५ पासून सुरू करण्यात येणार आहेत.

नालेसफाईनंतर काढून ठेवण्यात आलेला गाळ काहीसा सुकल्यानंतर लगेचच उचलण्यात यावा, जेणेकरून तो रस्त्यावर किंवा नाल्याजवळ साचून न राहता शहराची स्वच्छता अबाधित राहील. रस्त्यालगत व नाल्याच्या किनाऱ्यावरील डेब्रिज तातडीने हटवण्याचे निर्देश बांधकाम विभागाला देण्यात आले. सद्यःस्थितीत सुरू असलेल्या नाले बांधकाम व खोदकामाच्या कामांची यादी त्वरित सादर करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच, नालेसफाई सुरू असलेल्या प्रत्येक प्रभागात स्वच्छता निरीक्षकांनी नियमितपणे कामाचा आढावा घ्यावा, असेही सांगण्यात आले.

या वर्षी नालेसफाईच्या कामात कोणतीही हलगर्जीपणा चालणार नाही, सर्व कामे विहित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी यावेळी दिले.

## भाईंदरच्या ग्राहकांना मिळणार उच्च दर्जाची इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे

**भाईंदर :** इंडकल टेक्नॉलॉजीजने डीजी १ इलेक्ट्रॉनिक्स बरोबर केलेल्या करारामुळे मीरा-भाईंदरसह एमएमआर क्षेत्रात असलेल्या सर्व भागातील ग्राहकांना उच्च दर्जाचे इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे मिळणार आहेत. इंडकल टेक्नॉलॉजीचे सहसंस्थापक ऋषिकेश जाधव यांनी मीरा रोड येथे पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, भारतातील सर्वात मोठ्या ट्रेडमार्क इंडकल टेक्नॉलॉजीज या ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक्सच्या ट्रेडमार्क लायसन्सिंग कंपनीने डीजी १ इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीबरोबर करारनामा केला असून त्यानुसार एमएमआर क्षेत्रातील ३६ स्टोअर्समध्ये ग्राहकांना उच्च दर्जाचे इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे उपलब्ध होतील. आमची वैविध्यपूर्ण उत्पादनश्रेणी ग्राहकांच्या अधिक जवळ घेऊन जाण्यास मदत होणार आहे. डीजी १ चे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक डॉ. हरीश के. मूलचंदानी यांनी सांगितले की, तुफान मागणी असलेल्या ब्रॅण्ड्सच्या माध्यमातून आमच्याकडील उत्पादनश्रेणी लक्षणीयरीत्या वाढवण्याची मुभा मिळणार आहे.

## महापालिका पशुवैद्यकीय विभागाच्या चौकशीचे आदेश



◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महापालिका पशुवैद्यकीय विभागात सुरू असलेल्या गैरकारभारामुळे श्वान निर्बीजीकरण करण्यात अपयशी ठरलेल्या पशुवैद्यकीय विभागाची चौकशी करण्याच्या झालेल्या मागणीनुसार महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन आयुक्तालयाने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांना चौकशी करुन त्याचा अहवाल अभिप्रायासह शासनास तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

महापालिका पशुवैद्यकीय विभागामार्फत श्वान निर्बीजीकरणचा ठेका देण्यात येतो, ठेकेदाराची मुदत डिसेंबर २०२४ मध्ये संपुष्टात आली होती, गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने श्वानाच्या संख्येत नियंत्रण ठेवण्यात तसेच निर्बीजीकरण करण्यात सदर ठेकेदार अपयशी ठरला असतानाही या वेळी पुन्हा त्याच ठेकेदाराला ठेका दिल्यामुळे यात गैरकारभार झाल्याची शंका व्यक्त करत मीरा रोड येथील एक समाजसेवक रवी खरात यांनी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन आयुक्ताकडे तक्रार दाखल केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन आयुक्तालयाचे उपायुक्त डॉ. शैलेश केंके यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांना चौकशी करुन त्याचा अहवाल अभिप्रायासह शासनास तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## केडीएमसी हद्दीतील खताची विक्री 'हरित-महासिटी कंपोस्ट' ब्रॅण्ड नावे होणार

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस हरित-महासिटी कंपोस्ट खत वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात जवळपास ८०० ते १००० टीपीडी इतका कचरा दैनंदिन निर्माण होतो. या कचऱ्याचे महापालिकेमार्फत दैनंदिन संकलन करून प्रक्रियेकरीता महापालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या कचरा व्यवस्थापन केंद्रावर पाठविण्यात येतो. महापालिका क्षेत्रातील निर्माण कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता विविध ठिकाणी प्रकल्प उभारणी करण्यात आली असून त्यापैकी मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम येथे ३५० टीपीडी क्षमतेचा व मोठागाव, डोंबिवली येथे १०० टीपीडी क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या ठिकाणी संकलीत केलेल्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन खत निर्माण करण्यात येत आहे.

या खताचा महापालिका क्षेत्रातील तसेच लगतच्या ग्रामीण भागतील




शेतकरी वर्ग तसेच नागरीक यांना लाभ मिळावा या हेतूने प्रकल्पाच्या ठिकाणी निर्माण करण्यात येत असलेल्या खताचे नमुने तपासणीकरीता महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आले होते. त्यानुसार खताचे नमुने परिक्षणानंतर खत वापराकरीता योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर कचऱ्यावर प्रक्रिया करुन तयार होणाऱ्या सेंद्रिय खताची विपणन व विक्री करण्यासाठी हरित–महासिटी कंपोस्ट हा शासनाचा नोंदणी कृत ब्रॅण्ड वापरण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय, मुंबई येथे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाची छाननी होवून खत तपासणी अहवाल एफसीओ मानकांनुसार असल्याचे दिसून आल्याने, स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी विकास अभियान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे कल्याण डोंबिवली महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत निर्मित कंपोस्ट खताच्या विक्री व विपणनासाठी हरित महासिटी कंपोस्ट हा शासनाचा नोंदणीकृत वापरण्यासाठी परवानगी देण्यात आली असून "हरित- महासिटी कंपोस्ट" ब्रॅण्ड एक वर्षासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना प्रदान करण्यात आला आहे.

यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रकल्पावर निर्माण होणाऱ्या खताची विपणन व विक्री करणे शक्य होणार असून यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडण्यास मदत होणार आहे. तसेच याचा फायदा हा महापालिका क्षेत्रातील तसेच लगतच्या ग्रामीण भागातील शेतकरी व इतर नागरीक यांना देखील होईल.

## मनोरुग्णालयात 'नव्या वास्तूत जुन्या आठवणींचा प्रवास' कार्यक्रमाचे आयोजन

### ठाणे मनोरुग्णालयाच्या जुन्या वास्तू डोळ्यांत साठवताना अनेकांना अश्रू आवरेना

**प्रशांत सिनकर**

**ठाणे :** "जुन्या पाऊलखुणा काळाच्या पडद्याआड जाताना होणारं दुःख शब्दांत मावणं अशक्य असतं..." ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या शतकानुशिक वास्तू पुढच्या काही दिवसांत पाडण्यात येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर, त्या आठवणी कायमस्वरूपी मनात साठवण्यासाठी 'नव्या वास्तूत जुन्या आठवणींचा प्रवास' या भावनिक कार्यक्रमाचं आयोजन रुग्णालयात करण्यात आलं होतं.



१९०१ मध्ये स्थापन झाले आणि ठाण्याचा अविभाज्य भाग असलेले हे रुग्णालय सुमारे ७२ एकर परिसरात पसरले. सध्या १८५० खाटांची क्षमता आहे. मात्र आता याच ठिकाणी बंगळूरुच्या NIMHANS धर्तीवर भारतातील एक अद्ययावत आणि भव्य मनोरुग्णालय उभारण्यात येणार आहे. नव्या रुग्णालयात एकूण ३२७८ खाटा, वैद्यकीय अधिकारी, तृतीय-चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी निवास, रुग्णांसाठी पुनर्वसन केंद्र, मुलांसाठी स्वतंत्र विभाग, न्यूरोलॉजी विभाग, सर्जरी यांसारख्या आधुनिक सुविधा असणार आहेत. याचा उत्साह असला, तरी ज्यांनी दशकेभर या जुन्या वास्तूंमध्ये काम केले, त्यांच्यासाठी हे क्षण भावनिक होते. वास्तू पाडल्या जात असल्या, तरी त्यातील आठवणी कायम जपल्या जातील, असे मत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमादरम्यान रुग्णालयाची चित्रफित देखील दाखवण्यात आली होती. यावेळी आरोग्य उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक, डॉ. संजय बोदडे, माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय कुमावत, डॉ. पारस लव्हात्रे, डॉ. जी एस दाते, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. धीरज महांगडे, डॉ. ममता आळसपूरकर आदी आजी माजी वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्य शासन लवकरच नव्या इमारतींचं बांधकाम सुरू होणार आहे. मनोरुग्णालयाची काही जागा रेल्वे आणि महापालिकेला विकासासाठी दिल्या आहेत, मात्र उरलेल्या भागात रुग्णालयाचा आधुनिकतेचा नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

> हे मनोरुग्णालय १९०१ मध्ये सुरू झाले. पुढे मुंबई, ठाणे, पालघर, अलिबाग, नाशिक, धुळे नंदुरबार, जळगाव येथे हे मनोरुग्णालय बांधले गेले. त्यावेळी नवरोतमदास माधवदास यांनी रुग्णालय बांधकामासाठी ३५ टक्के रक्कम दिली होती. आता या वास्तू जीर्ण झाल्या असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या मार्गदर्शनाखाली एका नव्या जडणघडणीत रुग्णालय आकार घेणार आहे.
>
> **- डॉ. नेताजी मुळीक**
> (वैद्यकीय अधीक्षक ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालय )

## कल्याणमध्ये नाट्यप्रशिक्षण शिबीर

**कल्याण :** कल्याणात सातत्याने नाट्य चळवळ चालवणाऱ्या चार-मित्र कल्याण या संस्थेने कल्याण शहरात प्रथमच सुप्रसिद्ध रंगकर्मी अतुल पेठे यांचे नाट्यप्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे. महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीवर गेली चाळीस वर्ष सातत्याने प्रयोग करीत आलेल्या अतुल पेठे, प्रदीप वैद्य, ओंकार गोवर्धन, डॉ. रिबेका दोडती यांच्याकडून नाटक शिकणे म्हणजे कल्याण-डोंबिवलीकर रंगकर्मींना मोठी पर्वणी आहे. सर्व रंगकर्मींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन चार-मित्र कल्याण या संस्थेच्या वतीने करण्यात आले असून हे शिबीर ब्राईटन वर्ल्ड स्कूल, गौरी पाडा तलावाजवळ कल्याण (प.) येथे होणार आहे.

### जिल्ह्यात हृदयविकारग्रस्तांना जीवनदान देण्याचा संकल्प

# ठाण्यात आरोग्य अधिकाऱ्यांना सीपीआर प्रशिक्षण

◆ **ठाणे ( प्रतिनिधी) :**

सद्यस्थितीत वाढत्या हृदयविकाराच्या घटनांमुळे अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत. हृदयविकाराच्या झटक्यामुळे अचानक हृदयक्रिया बंद झाल्यास रुग्णाला तत्काळ CPR (Cardio Pulmonary Resuscitation) मिळाल्यास त्याचा जीव वाचू शकतो. हाच महत्त्वाचा उद्देश समोर ठेवून ठाणे जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने CPR प्रशिक्षण मोहीम राबवली आहे. ही मोहीम आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार आणि मुख्य कार्यकारी



अधिकारी रोहन घुगे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे.

**प्रशिक्षणाचे टप्पे:**

**टप्पा १ :** ७ एप्रिल २०२५ रोजी आरोग्यमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि इतर जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर यांच्यामार्फत दृकश्राव्य माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले.

**टप्पा २ :** ८ एप्रिल २०२५ रोजी सर्व वैद्यकीय अधिकारी आणि समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

**टप्पा ३ :** तालुका स्तरावरील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**टप्पा ४ :** प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत आशा व अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण दिले जाईल.

**टप्पा ५ :** प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी शाळा आणि महाविद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थ्यांना CPR चे प्रशिक्षण देतील.

**टप्पा ६ :** VHNSC सदस्य, जन आरोग्य समिती सदस्य आणि सामान्य नागरिकांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून हृदयविकारामुळे होणारे मृत्यू कमी करणे आणि आपत्कालीन प्रसंगी तत्काळ मदतीचा हात देणे हा उद्देश आहे.

## विधिज्ञ भारती मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी पुरस्काराने सन्मानित

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

न्यायालयीन कामात पीडित, वंचित महिलांसाठी काम करणाऱ्या महिला वकील भारती कोलमकर यांना मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीचा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.

कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार, वैवाहिक दाव्यात त्या महिलांना मोफत सल्ला देत न्यायालयीन कामात मदत करतात. ठाणेकर असलेल्या भारती विशाल कोलमकर या कायदातज्ज्ञ म्हणून प्रचलित आहेत. तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या



गृहमंत्री कार्यकाळात मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीशांच्या दरबारी ज्या २० कायदा विद्यार्थ्यांची निवड झाली होती त्यात भारती यांचाही समावेश होता.

आता त्या ठाणे, पुण्यात वंचित, पीडित घटकांसाठी कायदेशीर सल्ले, त्यांच्यासाठी न्यायालयीन दावे लढण्याचे काम करतात. विशेषतः वंचित घटकातील महिलांना त्या मदत करतात.

त्यांच्या या कार्याची दखल घेत महाराष्ट्रात काम करणाऱ्या मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीने त्यांची गुणवंत वकील म्हणून निवड करत भारती यांना ग्लोबल अचिव्हर्स अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल वकील वर्गातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# शिल्लक सेनेचे दिशाहीन मेळावे

उबाठा शिवसेनेचा निर्धार मेळावा नाशिकमध्ये पार पडला, अर्थात हा उबाठा शिवसेनेच्या प्रमुखांच्या भाषणांमध्ये गेल्या तीन-साडेतीन वर्षांपासून फारसे काही नावीन्यच शिल्लक न राहील्याने निर्धार मेळावा हा विनानिर्धारानेच पार पडल्याची नाराजीची चर्चा खुद्द उबाठा सेनेमधील शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे. पूर्वी शिवसेनेचा मेळावा कोठेही असो, शहरी भागात होवो अथवा ग्रामीण भागात होवो. मेळाव्यामध्ये शिवसैनिकांची गर्दी उत्स्फूर्त असायची, मैदानांमध्ये गर्दीचा उच्चांक करणारी असायची. दस्तुरखुद्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जेव्हा खुल्या पटांगणामध्ये बोलताना सुरुवातीलाच 'येथे जमलेल्या माझ्या तमाम शिवसैनिकांनो', अशी सुरुवात करायचे, त्यावेळी गगनभेदी जयघोषांच्या आरोळ्या होत असायच्या, शिवसेना जिंदाबाद, जय महाराष्ट्र या घोषणांनी आसमंत दणाणून निघायचा, पण हे सारे इतिहासजमा झाले आहे. शिवसेनाप्रमुखांचे पुत्र असणाऱ्या उद्धव ठाकरेंना बाळासाहेबांची शिवसेना वाढविण्यात यश तर आलेच नाही, पण शिवसेनेचा तो दरारा, रुबाब, शिवसैनिकांचे प्रेमही टिकविण्यास अपयश आले. शिवसेनाप्रमुखांच्या केवळ आदेशावर ज्यांनी रक्ताचे पाणी केले, स्वतःच्या घरादारांकडे, मुलाबाळांकडे अगदी संसाराकडे कानाडोळा करून ज्यांनी संघटना वाढविली, त्यांनाच संघटनेच्या कामकाजातून अलिप्तता स्वीकारण्यास भाग पाडण्यास उद्धवच्या नेतृत्वाने सुरुवात केल्यावर संघटनेच्या पडझडीला सुरुवात झाली आणि या गोष्टीला, आजच्या शिवसेनेच्या वाताहतीला दस्तुरखुद्द उद्धव ठाकरेच जबाबदार आहे. वारसा हा विचाराने आणि कर्तृत्वाने यायला लागतो, तरच त्या संघटनेची घोडदौड होते. शिवसेनाप्रमुखांचा वारसा केवळ मुलगा या नात्याने उद्धव ठाकरेंकडे आला, पण कर्तृत्व आणि विचारधारा, संघटनाबांधणी यात योगदान शून्य असल्याने तसेच निष्ठावंतांवर अन्याय केल्याने हा वारसा केवळ कागदोपत्रीच राहीला. त्यामुळेच शिवसेना संघटनेत फाटाफूट झाली. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली तब्बल ३९ आमदारांनी, विधान परिषदेच्या अनेक आमदारांनी, अधिकाधिक पदाधिकाऱ्यांनी, सर्वाधिक माजी नगरसेवकांनी आणि बाळासाहेबांवर प्रेम करणाऱ्या लाखो शिवसैनिकांनी शिवसेना उद्धव ठाकरेंपासून वेगळी केली आणि त्यामुळे उद्धव ठाकरेंकडे असलेल्या सेनेला राजकारणात उपहासाने शिल्लक सेना या नावाने संबोधले जावू लागले. एकेकाळी मोठमोठी क्रिडांगणे कमी पडेल इतकी अफाट गर्दी असणारे शिवसेनेचे मेळावे आता उद्धव ठाकरेंना बंदीस्त हॉलमध्ये घेण्याची वेळ आली आहे. दुपारचे कडक ऊन मान्य असले तरी सायंकाळी मेळावे घेण्यास हरकत नव्हती; परंतु आता पूर्वीसारखे वलय न राहिल्याने, दरारा न राहिल्याने आणि शिवसैनिकही न राहिल्याने 'झाकली मुठ सव्वा लाखांची' या उक्तीप्रमाणे हॉलमध्ये मेळावे घेऊन तीच तीन भाषणे, तेच तेच मुद्दे, तेच तेच आरोप यामुळे उद्धव ठाकरेंच्या मेळाव्यामध्ये नावीन्यही राहिलेले नाही. शिवसेनाप्रमुखांच्या मेळाव्यानंतर शिवसैनिकांना आदेश मिळायचा, एक नवीन विचार मिळायचा, सभेतून परतणाऱ्या शिवसैनिकांच्या चेहऱ्यावर एक तेज आणि नजरेमध्ये अंगार पाहावयास मिळत असे. पण आता हे सर्व इतिहासजमा झाले आहे. मुळातच असंगाशी संग केल्यावर परिणामाची किंमत मोजावी लागतेच, तेच आज उद्धव ठाकरेंच्या बाबतीत घडले आहे. पण संघटनेत मोठ्या प्रमाणावर पडझड होऊनही, शिवसेनेच्या मातब्बर सरदारांनी साथ सोडूनही त्यातून उद्धव ठाकरे कोणताही बोध घेण्यास तयार नाहीत आणि आपला हेकेखोरपणा सोडावयास तयार नाहीत. त्यामुळेच शिल्लक सेनेमध्ये आजही मोठ्या प्रमाणावर गळती सुरू आहे.

शिवसेना वाढली ती शिवसैनिकांच्या परिश्रमावर, शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेहनतीवर, शिवसेनेत असलेल्या तत्कालीन नेत्यांनी शहरी व ग्रामीण भागांत केल्यावर संघटना बांधणीवर. अर्थात या सर्व लोकांचे प्रेम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंवर होते. उद्धव ठाकरेंचे त्या काळात संघटना आणि संघटना बांधणीमध्ये काडीमात्रही योगदान नव्हते. ज्या नाशिक शहरातून शिवसेनेच्या महाअधिवेशनातून राजकीय सारीपाटावर उद्धव ठाकरेंचे संघटनात्मक पर्दापण झाले, अर्थात शिवसेना त्या काळात सर्वोच्च शिखराच्या दिशेने वाटचाल करत होते. अनेक राजकीय घटक उद्धव ठाकरेंचा भाषणातून उल्लेख 'आयत्या पिठावर रेघोट्या मारणारा' असाच करतात. नाशिकच्या त्या महाअधिवेशनात संघटनात्मक पदावर खऱ्या अर्थाने राज ठाकरेंचा अधिकार होता, पण त्यांना डावलून तो अधिकार उद्धव ठाकरेंना देण्यात आला. २०१९ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना-भाजपा एकत्रितपणे निवडणूक लढली, पण भाजपाला स्ववळावर सत्ता मिळणे शक्य नसल्याचे लक्षात येताच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी मुख्यमंत्रीपदासाठी सोबत केली. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री पद मिळाले, पण शिवसेना संघटना मात्र त्यांना शिवसेना नेत्यांसह, पदाधिकाऱ्यांसह, शिवसैनिकांसह गमवावी लागली. वडिलांनी निर्माण केलेली, नावलौकीकास आणलेली संघटना पुत्राने केवळ मुख्यमंत्री पदासाठी गमावली, असा शिक्का उद्धव ठाकरेंवर लागला आहे. संघटनेची पडझड थांबविण्यासाठी, शिल्लक सेनेत राहिलेल्या उरल्यासुरल्या शिलेदारांना सांभाळण्यासाठी, शिवसैनिकांसाठी कोणतीही नवीन ठोस भूमिका उद्धव ठाकरे घेत नसल्याने मागील साडेतीन वर्षांच्या काळात उद्धव ठाकरेंच्या भाषणातही तोचतोचपणा पाहावयास मिळत आहे. विधानसभा निवडणुकीत उबाठा शिवसेनेने महाराष्ट्रीय जनतेचा जनाधार गमाविल्याने अवघे १५च आमदार त्यांचे निवडून आले आहेत. उलटपक्षी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या संख्याबळात पूर्वीच्या तुलनेत कमालीची वाढ झाली आहे. जनतेने एकनाथ शिंदेंचीच शिवसेना यावर एकप्रकारे मतपेटीतूनच शिक्कामोर्तब केले आहे. मुस्लीमधार्जिण्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी उद्धव ठाकरेंनी केलेली सोबत आजही शिवसैनिकांच्या व जनतेच्याही पचनी पडलेली नाही. त्यामुळे त्यांनी याचा संताप विधानसभा निवडणुकीत मतदानातून काढला आहे. गेली साडेतीन वर्षे तीच अर्थहीन भाषणे, कणाहिन नेतृत्व, विचारांचा, धोरणांचा अभाव, सर्व काही गमावूनही हेकेखोरपणाचा ताठपणा यामुळे उबाठांच्या शिल्लक सेनेमध्ये नजीकच्या काळात कोण शिल्लक राहील, हाच आज एक संशोधनाचा विषय आहे.

# अग्निसुरक्षा एक सामाजिक जबाबदारी

आपल्या संस्कृतीमध्ये अग्नी पूजा हा अतिशय महत्त्वाचा संस्कार मानला जातो. त्यामुळे अग्नीचे पावित्र्य राखणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे असे मला वाटते; परंतु प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही हे वारंवार लागणाऱ्या आगीमुळे उघड होणारे कटू सत्य आहे.

आपत्ती समोर सर्व समान असतात. मग ती नैसर्गिक असो किंवा मनुष्य निर्मित असो. सदैव न्याय हक्कासाठी भांडणाऱ्या, आधुनिकतेचा ध्यास घेतलेल्या नागरिकांना तसेच विकासाची कास धरू पाहणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांना अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन व्यवस्थापन या विषयांबाबत खरोखर गांभीर्य आहे का? असा प्रश्न माझ्यासारख्या सर्वसामान्य नागरिकास पडतो. विविध दुर्घटनांमुळे नागरीप्रशासन व लोकनियुक्त सरकार अग्निसुरक्षेबाबत सजग नसल्याचे प्रकर्षाने समोर येते.

या संदर्भात खालील काही मुद्दे उपस्थित होतात.

**१. इमारती सभोवतालची मोकळी जागा व परिसर रचना** : रहिवासी इमारतीचा भाग व व्यावसायिक दुकाने पूर्णतः वेगळे असावेत. झोपडपट्ट्यांच्या ठिकाणी एकमजली वा दुमजली झोपड्यांमध्ये तळमजल्यावर व्यावसायिक दुकाने प्रस्थापित केली जाऊन त्यावरील पोटमाळ्यावर राहण्याच्या गैरसोयीमुळे बरीचशी कुटुंबे वास्तव्य करीत असतात. पुढच्या बाजूला दुकान व पार्टीशन करून मागील बाजूस कुटुंब राहते अशा लोकांना दुकानाच्या मुख्य दरवाजाशिवाय बाहेर जाण्यासाठी दुसरा पर्यायी मार्ग नसतो. तरी मुंबईतील दुकाने व व्यवस्थापने यांची तपासणीची जबाबदारी असलेल्या महानगरपालिकेच्या लायसन्स डिपार्टमेंटकडून काटेकोरपणे तपासणी करण्याची भूमिका निभावली जाते का? बऱ्याच वेळी बहुमजली इमारतीमध्ये देखील तळमजल्यावर व्यावसायिक दुकाने, पहिल्या दुसऱ्या माळ्यावर वाहने पार्किंग तसेच ऑफीस / दुकाने यांना महानगरपालिका व अग्निशमनदल यांनी परवाने दिलेले पाहावयास मिळतात. रहिवासी इमारतीमध्ये व्यावसायिक आस्थापने, दुकाने व व्यवस्थापनाला परवानगी देताना प्रत्येक इमारातीमध्ये २ स्वतंत्र जिने परस्परविरुद्ध बाजूला असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण इमारतीमध्ये आगीसारखी दुर्घटना घडल्यास इमारतीच्या वरील माळ्यांवरील व्यक्तींना दुसऱ्या जिन्याने सुरक्षित ठिकाणी जाता येणे शक्य होईल. तसेच सामाजिक भान ठेवून इमारतीच्या मोकळ्या जागेमध्ये वाहने अवास्तव पार्क करून ठेऊ नयेत व इमारतीच्या आसपासची, भोवतालची जागा (६ मीटर) पूर्णपणे मोकळी ठेवावी. जेणेकरून अग्निशमन वाहने सहजपणे व विनाअडथळा दुर्घटनास्थळी पोहोचून अग्निशमन व विमोचनाचे कार्य तत्काळ सुरू करतील. ज्यामुळे जीवितहानी टाळता येईल व वितहानी कमी होण्यास मदत होईल. इमारतीतील रहिवाशांनी या सामाजिक बांधिलकीचे काटेकोरपणे पालन केल्यास हे शक्य आहे.

**२. इमारतीच्या अंतर्गत भागातील बाल्कनी, कॉरीडोअर, लिफ्टलॉबी व स्टेअरकेस** : या मोकळ्या जागा बहुतांशी सर्वच रहिवासी व व्यावसायिक इमारतीमध्ये असे पाहावयास मिळते की, प्रत्येक मजल्यावरील कॉमन



कॉरीडोअर, पॅसेज व लिफ्टलॉबीमध्ये त्या मजल्यावरील रहिवासी स्वतःच्या घरातील अतिरिक्त किंवा टाकाऊ असलेले सामान साठवून ठेवण्यासाठी आपल्या हक्काच्या जागा आहेत असे सर्वमान्य केलेले आहे.

इमारतीतील मजल्यास, एखाद्या घरास आग लागल्यास सदर आग घराबाहेर पसरली, तर कॉरीडोअर, पॅसेजमध्ये ठेवलेले लाकडी सामान, चपलांचे स्टँड, गैरसोयीचे फर्निचर इत्यादी वस्तू पॅसेजमधून आग पसरविण्यास मदत करतात. तसेच बऱ्याचवेळी असे देखील निदर्शनास येते की, इमारतीतील कॉरीडोअर, पॅसेजमध्ये धातूच्या तारा अथवा दोऱ्या बांधून सदर भाग कपडे वाळविण्यासाठी वापरला जातो. सदर कपडे वाळत घालण्याच्या छत किंवा भिंतीवरून इलेक्ट्रिक वायर किंवा केबल गेलेल्या असतात ज्या गोष्टी आगीचा प्रसार करण्यास प्रामुख्याने हातभार लावतात. तरी सर्व रहिवाशांना असे आवाहन करावेसे वाटते की, घरातील अतिरिक्त सामान कॉरीडोअर, पॅसेज, लिफ्टलॉबी व जिने यामध्ये ठेवून अडथळा निर्माण करू नये.



सुरक्षा घोसाळकर
(अग्निशमन स्वयंसेविका)

**३. इमारतीतील अग्निशमन यंत्रणा व त्यांची कार्यक्षमता** : मुंबईची जमिनीशी समांतर असणारी वाढ गेल्या काही वर्षांत पूर्णतः खुंटलेली आहे. बहुमजली इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना स्वतः, स्वतःचे कुटुंब व इतर लोकांच्या सुरक्षिततेबाबत कोणतेही देणेघेणे नसणे व सुरक्षिततेबाबत असलेले सामाजिक भान याचा अभाव दिसतो. त्यामुळे बहुमजली इमारतींच्या अंतर्गत अग्नी सुरक्षिततेची साधने व्यवस्थित कार्यरत आहेत किंवा नाही? इमारतीच्या विद्युत डक्ट / शाफ्ट प्रत्येक माळ्यावर सिल केलेले आहेत किंवा नाहीत? अग्नीशमन पंप कार्यरत आहेत किंवा नाहीत? प्रत्येक माळ्यावरील हायड्रन्ट पॉइंट, होजरिल, फायर अलार्म चालू स्थितीत आहेत किंवा नाही याचाचत पूर्णतः अनास्था आढळून येते. इमारतीच्या प्रत्येक माळ्यावरील विद्युत डक्ट म्हणजे घरातील अडगळीचे सामान साठवून ठेवण्याची प्रत्येकाची हक्काची जागा असे समजताना त्यामागील धोके कधीच गांभीर्याने का घेत नाही? प्रत्येक मजल्यावरील कॉरीडोअर मधून जिन्यामध्ये उत्तरण्यापूर्वी लावण्यात आलेले अग्नी प्रतिरोधक लाकडी दरवाजे बऱ्याचदा काढलेले आढळतात किंवा त्याची स्वयंचलित बंद होण्याची व्यवस्था नादुरुस्त अवस्थेत असते.

**४. टेरेस व रिफ्यूज एरिया** : आजकाल इमारतीमध्ये ओपन टेरेस व रिफ्यूज एरिया हा हाऊसिंग सोसायट्यांचा कम्युनिटी हॉल किंवा एन्टरटेनमेन्ट हब म्हणून वापरण्याची प्रथा प्रचलित झाली आहे. इमारतीमध्ये आगीसारख्या दुर्घटना घडल्यास मजल्यावरील रहिवाशांच्या सुरक्षिततेचे ठिकाण म्हणून टेरेस व रिफ्यूज एरिया विनाअडथळा पोहोचण्यासाठी खुला व सुरक्षित असणे अत्यंत गरजेचे आहे; परंतु इमारतीचे पदाधिकारी व कार्यकारी मंडळ सदर जागा व्यापणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे अशा थाटातच वावरत असतात व आपल्या अशा निर्बुद्ध वर्तनाने प्रत्येक रहिवाशांच्या जीवास धोका निर्माण करत असल्याची किंचितही जाणीव त्यांच्या मनास स्पर्श करीत नाही. इतक्या सर्वांच्या भावना बोथट झाल्या आहेत का? त्यामुळे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे की स्वतःच्या प्रतिष्ठेचे प्रदर्शन करण्यासाठी इंटेरीअर डेकोरेशन व फर्निचरवर जसा लाखो रुपयांचा खर्च केला जातो तशीच दक्षता घरामध्ये पोर्टेबल फायर एक्सटिंगविशर, स्मोक डिटेक्टर, स्प्रिंकलर लावण्यासाठी घ्यावी. ९०% आगीच्या घटना या शॉर्ट सर्किटमुळे घडलेल्या असतात. इमारतीतील प्रत्येक घरात आधुनिक उपकरणे वापरताना इलेक्ट्रिक लोड किती आहे? दहा वर्षांमध्ये रिवायरींग करणे इतक्या साध्या गोष्टींचे भान देखील स्वतःला सुशिक्षित व उच्चभ्रू मानणाऱ्यांनी ठेवले पाहिजे.

नगरविकास खाते व सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या समन्वयाने दर ६ महिन्याने फायर ऑडिट आणि १ वर्षांनी इलेक्ट्रिकल ऑडिट करण्याचे नियम काटेकोरपणे पाळले जाण्यासाठी अंकुश ठेवला पाहिजे.

या व्यतिरिक्त झाड पडणे, पूरस्थिती, लॅन्ड स्लाइड, हाऊस कोलॅप्स, लिफ्ट, मॅनहोल, फटाके यामुळे होणाऱ्या दुर्घटना याकरीता राज्यशासनाच्या यंत्रणा तोकड्या पडतात. अग्निशमन दल अत्याधुनिक होत असले तरी त्यांच्याकडे ९० मीटर उंची पर्यंत म्हणजे साधारणतः २८ मजल्यापर्यंतच पोहोचणारी लेंडर, ५५ मीटरचा वॉटर टॉवर, रिमोट कंट्रोल रोबोट उपलब्ध आहेत ते हाताळताना त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. रेस्क्यू आणि फायर फायटींग ड्रोन, फायर सर्व्हिस सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी अभ्यासू फायर फायटर प्रयत्नशील आहेत.

टोलेजंग इमारती, कोस्टल रोड, फिवे, स्काय वॉक, मेट्रो इत्यादीचा ध्यास घेतलेल्या प्रशासकीय यंत्रणांनी आपत्कालिन सेवा देणाऱ्या अग्निशमनदल, रुग्णवाहिका, पोलीस यांच्यासाठी स्वतंत्र मार्गिका उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच नागरिकांनी आपले घर व इमारतीतील विद्युत उपकरणे व स्वयंचलित यंत्रणा, एल.पी.जी. गॅस / पी.एन.जी. गॅसलाईन तसेच कायम स्वरुपी अग्निशमन या याची गव्हर्नमेंट अप्रूव्हड लायसन्स एजन्सीकडून वारंवार तपासणी तथा योग्यवेळी दुरुस्ती व परिक्षण करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या युगामध्ये शाळा, महाविद्यालये, सरकारी व खासगी व्यवस्थापनामध्ये अग्नीसुरक्षा व आपत्कालिन व्यवस्थापन प्रशिक्षण सर्वांना कायद्याने सक्तीचे करावयास पाहिजे. असे झाल्यास दुर्घटनेच्यावेळी नागरिक लोकनियुक्त प्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणा व लोकनियुक्त सरकार यांची एकमेकांवर चिखलफेक करून आपली जबाबदारी झटकण्याच्या वृत्तीला आळा बसेल जेणेकरून स्वहित, समाज व देशाच्या प्रगतीसाठी हातभार लागेल यात तिळमात्र शंका नाही.




आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी अस्तित्वात आली. तेव्हापासून तिच्यावर अस्तित्वात असलेल्या हवा, पाणी, वनस्पती, प्राणी इत्यादी गोष्टींमध्ये आजपर्यंत बदल होत गेले. काही बदल नैसर्गिक होते, तर काही मानवनिर्मित. पण या बदलांचा पृथ्वीवर आणि त्या आनुषंगाने पर्यावर्णावरही होऊ लागला. हा बदल जसा सजीव सृष्टीवर वाईट परिणाम करू लागला तसा माणूस जागरूक होऊ लागला आणि तो सुसह्य, अनुकूल करण्यास सुरुवात झाली. हे सर्वप्रथम कुठे, कसे सुरू झाले आणि त्याचा जागतिक वसुंधरा दिवसाशी काय संबंध हे आपण पाहूया.

१९६०च्या दशकात अमेरिकेला पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जायला लागले. हवा आणि पाण्याच्या गुणवत्तेसाठी त्यावेळी काहीही कायदे अस्तित्वात नव्हते. पण प्रदूषण, तर मोठ्या प्रमाणात होते. विस्कॉन्सिनमधील त्या वेळचे सिनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी पर्यावरणाचे शिक्षण देण्याचा देशव्यापी कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले. १९६९ मध्ये नेल्सनने या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय समन्वयक म्हणून डेनिस हेस यांची निवड केली. हेसने संपूर्ण अमेरिकेत पृथ्वीदिनाचा प्रचार करण्यासाठी ८५ लोकांचा एक चमू तयार केला आणि २२ एप्रिल १९७० रोजी नेल्सन चे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. संपूर्ण अमेरिकेतील अंदाजे २ कोटी लोक ज्यात विद्यार्थी, पर्यावरणवादी संघटना, शिक्षक, शेतकरी अगदी राजकारणीसुद्धा एकत्र आले होते. त्यांची मागणी स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणासाठी ठोस कृती करण्याची होती. या पहिल्या पृथ्वीदिनाच्या यशाने हे दाखवून दिले की सार्वजनिक दबावामुळे पर्यावरणीय मुद्द्यांवर अर्थपूर्ण राजकीय कृती होऊ शकते. या पहिल्या पृथ्वी दिनाचा अमेरिकेच्या राजकारणावर खोल परिणाम झाला. पर्यावरण संरक्षण संस्थेची (Environmental Protection Agency) स्थापना झाली आणि प्रमुख पर्यावरणीय कायदे मंजूर करण्यात आले.

१. स्वच्छ हवा कायदा
२. पाण्याची गुणवत्ता सुधारणा कायदा
३. सुरक्षित पेयजल कायदा
४. कीटकनाशन नियंत्रण कायदा
५. संसाधन संवर्धन कायदा
६. व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य कायदा
७. खाण नियंत्रण कायदा ... यांचा समावेश होता.

१९९० मध्ये पृथ्वीदिन विस्तारला आणि तो एक जागतिक कार्यक्रम बनला. तब्बल १४१ देशातील २० कोटींहून अधिक लोकांनी पृथ्वीदिनाच्या कार्यक्रमात भाग घेतला. पर्यावरणातील आव्हानांबद्दल जागरूकता निर्माण झाली. १९९२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेने ह्याची दखल घेतली. १९९५ मध्ये गेलॉर्ड नेल्सन यांना पृथ्वीदिनाच्या स्थापनेतील महत्वपूर्ण योगदानाबद्दल अमेरिकेतील सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले. असा हा पृथ्वीदिन २२ एप्रिल २०२५ ला ५५ वर्ष पूर्ण करतोय. दरवर्षी ह्या दिवसाची एक विशेष संकल्पना घोषित केली जाते. यावर्षीची संकल्पना आहे 'आमची शक्ती, आमचा ग्रह' पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागृती करण्याचा हा दिवस. या संकल्पनेद्वारे जगभरातील सर्वांना अक्षय्य ऊर्जेसाठी एकत्र येण्याचे आणि २०३० पर्यंत जागतिक स्तरावर स्वच्छ वीजनिर्मिती तिप्पट करण्याचे आवाहन केले आहे.

अंजली पोतदार
मुंबई ग्राहक पंचायत

अक्षय्य ऊर्जा म्हणजे सूर्य, वारा, पाणी, प्रगत भूऔष्णिक वस्तू आणि कचरा या साऱ्यांपासून मिळवलेली ऊर्जा. यांनाच ऊर्जेचे अपारंपरिक स्रोत असेही म्हणतात. हे स्रोत निसर्गात विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. भारतात, तर सौरऊर्जा, जलऊर्जा हे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. कोळसा, लाकूड, पेट्रोल हे पारंपरिक स्रोत आता संपुष्टात येऊ लागले आहेत. यातून ऊर्जा निर्मिती खर्चही खूप असतो. पारंपरिक ऊर्जेच्या वापराने उत्सर्जित सी ओ टू वायू पर्यावरणाचे पर्यायाने सजीवांचेही आरोग्य धोक्यात आणतो. अक्षय्य ऊर्जास्रोत मात्र हरितगृह वायू उत्सर्जन कमी करतात. जीवाश्म इंधन हे हरितगृह वायूंचे प्रमुख उत्सर्जक असल्यामुळे जागतिक तापमान वाढीचे महत्त्वाचे कारण आहे. एक जागरूक ग्राहक म्हणून आपण पर्यावरण रक्षणासाठी वसुंधरादिनानिमित्त पुढील गोष्टी नक्कीच करू शकतो. आपले अन्न, कपडे, प्रवास, वीज आणि पाण्याचा वापर, तयार झालेला जैविक आणि प्लास्टिक कचरा या साऱ्याचे पर्यावरणातच शोषण होत असते.

त्यामुळे तयार झालेल्या कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया व त्याचा पुनर्वापर करणे
नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर करणे
शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार करणे
एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर थांबवणे
हवामान साक्षरतेचा प्रसार

अशा अनेक मार्गांचा स्वतःपुरता जरी अवलंब केला तरी आपला ग्रह ही आपली शक्ती नक्कीच होऊ शकेल अशी खात्री आहे.

**Email: mgpshikshan@gmail.com**

# जागतिक ऑटिझम दिनाच्या निमित्ताने

दोन एप्रिलला जागतिक ऑटिझम दिन होता. ऑटिझम म्हणजे नेमके काय याबद्दल मला कुतूहल होते. म्हणून ठाण्यातील 'राजहंस फाऊंडेशन' या संस्थेला मी भेट दिली. या संस्थेत ऑटिस्टिक मुलांच्या कलागुणांचा विकास केला जातो असे कळले होते. विशेष मुलांच्या संमेलनात या संस्थेने एकदा स्टॉल ठेवला होता व त्यात ऑटिस्टिक मुलांनी बनविलेल्या विविध वस्तू ठेवल्या होत्या. तेव्हा त्यांचा फोन नं. मी घेऊन ठेवला होता. दुपारच्या जरा निवांत वेळी मी 'राजहंस फाऊंडेशन'चा पत्ता शोधत तिथे पोहोचले. दारातून डोकावले तो आत म्युझिकचा आवाज येत होता. एका गाण्यावर मुले हातवारे करत होती. एक शिक्षिका त्यांना नृत्य शिकवत होती. एकंदर उत्साही वातावरण होते.

'कोणत्या कार्यक्रमाची तालीम वगैरे सुरू आहे की काय?' संस्थेच्या संस्थापिका मनीषा सिलम मॅडम यांना मी विचारले.

'हो, हो.' मनीषा मॅडम म्हणाल्या, "अठरा एप्रिलला आमचा दहावा वर्धापन दिन आहे. काशिनाथ घाणेकर रंगमंदिरात आमचा मोठा त्यात या मुलांचे नृत्य, वादन, गायन, सारेच असणार आहे. आम्ही शिक्षकदेखील सहभागी होऊ. त्याचीच तालीम सुरू आहे." मी प्रॅक्टिस बघत बसले. काही मुलींना नृत्यात खरेच गती होती असे दिसले. मनीषा मॅडम मला दुसऱ्या खोलीत घेऊन गेल्या. सोहम नावाचा मुलगा कीबोर्डवर गाणी वाजवत होता. त्याला नृत्य करायला यायचेच नाही. 'याला चाळीस पन्नास गाणी वाजवता येतात', मनीषा मॅडम म्हणाल्या. 'प्रत्येकाला कोणत्या कलेत गती आहे हे आम्हाला शोधून काढावे लागते. ही मुले कॉम्प्युटरदेखील शिकतात असे कळले. एका खोलीत मग प्रिंटिंगचे एक मशीन होते. इथे शिक्षकांच्या मदतीने मुले मगवर रंगीत चित्रे प्रिंट करू शकतात. मुलांना हस्तकला हाही एक विषय असतो. शिक्षकांच्या मदतीने त्यांनी प्राण्यांची अनेक रंगीत चित्रे तयार केली होती आणि ती पुठ्ठ्यावर लावली होती. हत्ती, चिमणी, पोपट, फुलपाखरू अशा निरनिराळ्या प्राण्यांची चित्रे हातात घेऊन त्यांचे काही स्किट्स सुरू झाले. तालमीतून थोडा अवधी मिळताच मी मनीषा मॅडम यांना संस्थेची माहिती विचारायला सुरुवात केली.





मेघना साने




ऑटिझम हा रोग नाही. ही शरीराची अवस्था आहे. जनुकीय दोषांमुळे ही अवस्था येण्याचे प्रमाण अधिक आहे. ही मुले जन्मतःच काही वेगळी आहेत हे पालकांना कळतही नाही. काही मुले चांगली गुटगुटीत, चंचल असतात, तर काही मुले अत्यंत हुशारही असू शकतात. पण हळुहळू त्यांच्या वर्तनातील फरक कळत जातो. ही मुले डोळ्याला डोळा भिडवत नाहीत. ती स्वतःमध्येच रमलेली असतात. म्हणून त्यांना स्वमग्न अशी संज्ञा आहे. आई-वडिलांना अशा मुलांना अभ्यास वगैरे शिकवणे कठीण जाते. कारण ती एकच एक गोष्ट करत राहतात. कधी कधी एकाच गोष्टीमधे सतत मग्न असल्यामुळे त्या उपक्रमात ते गती दाखवतात. या मुलांमध्येही काही कलागुण असतात व ते जोपासता येतात. कधी कधी लहानपणी ती गोल गोल फिरत राहतात. पालकांना आपलं मूल ऑटिस्टिक आहे हे कळल्यावर त्यांनी ते स्वीकारणं महत्त्वाचं असतं. ऑटिझम हा रोग नसल्यामुळे त्यावर औषधही उपलब्ध नाही. फक्त त्यांच्या कलागुणांना कसा वाव देता येईल आणि त्यांचं जीवन कसं सुंदर करता येईल एवढंच पालक बघू शकतात.

मनीषा मॅडम सांगत होत्या की त्यांचा मुलगा अडीच वर्षांचा झाल्यावर त्यांना कळले की हा ऑटिस्टिक आहे. त्यांनी ऑटिझमविषयी माहिती मिळवायला सुरुवात केली. 'तो एक राजहंस'; म्हणून ऑटिझमला वाहिलेला एक फेसबुक ग्रुप सुरू केला. अनेक ठिकाणांहून ऑटिस्टिक मुलांचे पालक यात जॉईन झाले. एकमेकांशी चर्चा करू लागले. मग वर्कशॉप घेऊ लागले. पुढे एक संस्थाच काढावी असे मनीषा आणि त्यांच्या मैत्रिणींनी ठरवले. एका वृद्धाश्रमाची जागा ही संस्था चालविण्यासाठी मिळाली. मग 'राजहंस फाऊंडेशन' या नावाने एक एनजीओ रीतसर स्थापन केली. तिथे ऑटिस्टिक मुलांची काळजी घेण्यासाठी आणि त्यांना विकसित करण्यासाठी शिक्षकही नेमले. काही पालकही शिक्षक म्हणून मदत करू लागले.

समाजामधे ऑटिझमविषयी जागृती करण्याबरोबरच अशा मुलांच्या पालकांना एकत्र आणणे, त्यांना नैराश्येतून बाहेर काढणे, त्यांची जगण्याची उमेद वाढवणे हे कार्य सुद्धा या संस्थेतील शिक्षक करतात. या संस्थेत अनेक कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित केली जातात. काही वेळा ऑटिझमबद्दल जागृत व्हावी म्हणून त्यांनी रॅलीही आयोजित केल्या होत्या. 'राजहंस फाऊंडेशन'मधे काही मुलांनी NIOS चा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. काही मुलांनी कॉम्प्युटर ट्रेनिंग पूर्ण केल्यानंतर Data Entry चे जॉबही पूर्ण केले आहेत. तसेच याच वर्षी निवडक मुलांनी Amazon ची महिनाभराची इंटर्नशिप पूर्ण केली व त्यातील काहींना नोकरीही लागली.

आपण वृद्ध झाल्यावर या मुलांकडे कोण बघणार याची चिंता पालकांना आत्तापासूनच भेडसावू लागली आहे. त्यामुळे सर्व पालकांनी एकत्र येऊन एक जागा घ्यावी व या मुलांची देखभाल करण्यासाठी कुशल पगारी माणसे नेमावीत असा विचार पुढे आला आहे. त्या दिशेने पहिले पाऊल म्हणून, ठाण्याजवळ अंजूर फाटा येथे जागा घेतली आहे व पुढील काम सुरू आहे.

या मुलांना सांभाळताना पालकांना खूपच पेशन्स ठेवावा लागतो आणि अगदी मृदू भाषेत त्यांच्याशी संवाद करावा लागतो. अशा अवस्थेतील मुलांचा विकास घडवून आणण्यासाठी स्वतःच्या आवडीनिवडी बाजूला ठेवून आपले आयुष्यच त्यांच्यासाठी खर्च करणाऱ्या पालकांच्या जिद्दीला माझा सलाम!

## राशिभविष्य

शुक्रवार, १८ एप्रिल २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती चैत्र कृष्ण पंचमी, शके १९४७. चंद्र नक्षत्र विशाखा. योग सिद्ध. चंद्र राशी तूळ भारतीय सौर २८ चैत्र शके १९४७ शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१९ मुंबईचा चंद्रोदय ८.४२, मुंबईचा सूर्यास्त ६.५६ मुंबईचा चंद्रास्त ७.२१ राहू काळ ७.५४ ते ९.२८, गुड फ्रायडे, शुभ दिवस

### ॥ भविष्य ॥

**मेष** : आत्मविश्वासात वृद्धी होईल.

**वृषभ** : खेळीमेळीचे वातावरण राहील.

**मिथुन** : ज्येष्ठांचा सल्ला ऐकणे योग्य ठरेल.

**कर्क** : रखडलेल्या व्यवहारांना गती मिळेल.

**सिंह** : समारंभाची निमंत्रणे मिळतील.

**कन्या** : कामात अडथळे येण्याची शक्यता.

**तूळ** : धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग.


**वृश्चिक** : अनेक कामे होतील.

**धनू** : इतरांशी स्पर्धा नको.

**मकर** : रखडलेली कामे मार्गी लावू शकाल.

**कुंभ** : मालमत्तेच्या कामात यश मिळेल.

**मीन** : विविध प्रकारचे लाभ होतील.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात वासंतिक उटी, मोगरा महोत्सव आयोजित करण्यात आला. मोगऱ्याच्या ५० लाख फुलांसह झेंडू, जास्वंद, गुलाब, चाफा सारख्या फुलांनी गाभाऱ्यासह सभामंडपात आकर्षक सजावट करण्यात आली.
(छाया : मंदार टण्णू)

# पूर्णत्वाला गेलेल्या प्रकल्पांची आयुक्तांकडून होणार पाहणी

## उड्डाणपुलासह अन्य काही प्रकल्पांचा समावेश

◆ पुणे (प्रतिनिधी):

शहरातील ज्या प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत, अशा प्रकल्पांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी घेतला आहे. यामध्ये नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावर बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलासह अन्य काही प्रकल्पांचा समावेश आहे.

सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी ते फनटाइम चित्रपटगृहादरम्यान उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. केवळ पथदिवे व दिशादर्शक फलक बसविणे हे काम शिल्लक आहे. महापालिकेच्या वतीने या भागात सव्वादोन किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हे काम सुरूच असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.





हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केल्यास या भागातील होत असलेली वाहतूक कोंडी सुटणार आहे. त्यामुळे हा पूल तातडीने नागरिकांना वापरण्यासाठी खुला करावा, अशी मागणी केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांना विचारले असता, ते म्हणाले, 'या उड्डाणपुलासह इतर काही प्रकल्पांची कामे पूर्णत्वाला गेली आहेत. त्या सर्वांची पाहणी प्रत्यक्ष जाऊन करणार आहे. येथे सर्व गोष्टी व्यवस्थित झाल्या आहेत, की नाही, याची तपासणी करणे आवश्यक आहे. उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर त्यातील त्रुटींवरून नागरिकांकडून टीका होऊ नये, यासाठी पाहणी करणार आहे. ही पाहणी अचानक केली जाईल. त्यानंतर पूल खुला करण्याबाबतचे निर्णय घेतला जाईल. इतर पूर्ण होत असलेल्या प्रकल्पांची पाहणीदेखील अचानकपणे करणार आहे,' असे त्यांनी सांगितले.

महापालिकेची आगामी निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून या उड्डाणपुलाच्या कामाचे उद्घाटन केले जाणार असल्याचे बोलले जात आहे. सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा उड्डाणपूल महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणार आहे. त्यामुळे या उड्डाणपुलाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हावे, असा प्रयत्न या भागातील लोकप्रतिनिधींचा आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांची वेळ मिळत नसल्याने काम पूर्ण होऊनही याचे लोकार्पण रखडल्याची चर्चा आहे

सविस्तर चर्चा करून अहवाल तयार करणार

# महात्मा फुले स्मारकासाठी जागा बाधितांचे फेर सर्वेक्षण

◆ पुणे (प्रतिनिधी):



महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागा ताब्यात घेताना संबंधित जागामालक तसेच तेथील भाडेकरूंना नुकसानभरपाई कशी द्यायची, यासाठी येथील जागाबाधितांचे सर्वेक्षण पुन्हा करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या भागातील जागामालक, भाडेकरूंच्या घरी जाऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांना कोणत्या प्रकारचा मोबदला अपेक्षित आहे, याची माहिती गोळा करून अहवाल तयार केला जाणार आहे.

> महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी जागा ताब्यात घेण्यासाठी नव्याने सर्वेक्षण केले जाणार आहे. यामध्ये संबंधित जागामालक, भाडेकरूंशी संवाद साधून त्यांना नुकसानभरपाई काय पाहिजे, याबाबत सविस्तर चर्चा करून अहवाल तयार केला जाणार आहे.
> **- डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त

महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी बुधवारी ही माहिती दिली. स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेच्या सेवेतील उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार आहे. तसेच, जागा ताब्यात घेताना सक्तीचे भूसंपादन न करता जागामालकांना आवश्यक तो मोबदला देऊन या जागा ताब्यात कशा मिळतील, यासाठी महापालिका प्रशासनाचा प्रयत्न राहणार असल्याचे आयुक्त डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले. महापालिकेने काही वर्षांपूर्वी या भागाचे सर्वेक्षण केले होते. त्यावेळी ९१ मिळकती बाधित होणार असल्याचे समोर आले होते. यामध्ये जागा मालक आणि भाडेकरूंचा समावेश आहे.

जागा ताब्यात घेताना महापालिकेने जागेच्या बदल्यात जागा द्यावी, अशी मागणी काहींची आहे. तर, काही भाडेकरू आणि जागामालकांनी रोख मोबदला मिळावा, अशी मागणी केली आहे. महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक या दोन वास्तू एकत्रित जोडण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी येथील खासगी जागा ताब्यात घ्याव्या लागणार आहे.

या दोन्ही वास्तूंचे एकत्रीकरण आणि विस्तारासाठी ९१ मिळकती बाधित होणार असून, त्याचे क्षेत्रफळ पाच हजार ३१० चौरस मीटर आहे. यामध्ये ५१६ मालक आणि २८५ भाडेकरू आहेत. या सर्वांशी चर्चा करून त्यांच्या जागा ताब्यात घेण्याचा महापालिकेचा प्रयत्न असल्याचे आयुक्त डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले. महापालिकेला भूसंपादनासाठी किती नुकसान भरपाई द्यावी लागेल, याचा अभ्यास केला जाणार आहे. याबाबतच्या सर्व सूचना महापालिका प्रशासनाला देण्यात आल्याचेही आयुक्त राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केले.

## वेचक

### मोबाईल हिसकावणारी टोळी गजाआड

**पुणे :** नागरिकांचे मोबाइल हिसकावून गायब करणारी परप्रांतीय टोळीचा खडकी पोलिसांनी पर्दापाश केला आहे. त्यांच्याकडून ८ लाख रुपये किंमतीचे तब्बल ३० मोबाइल जप्त केले आहेत. टोळीने पुणे, पिंपरी-चिंचवडसह अनेक ठिकाणी लुटमार केल्याचे प्राथमिक तपासात उघडकीस आले आहे. टोळीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप फुलपगारे, उपनिरीक्षक दिग्विजय चौगुले उपस्थित होते. अभिषेक मेहता, दिनेश नोनिया, रोहनकुमार चौरोसिया, राजेश नोनिया, सचिन कुमार, उजीर सलीम शेख, अमिर नुर शेख, सुमित महातोकुमार, कुणाल महातो अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. वाकडेवाडी रोडवरील भारत पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीने एक टोळी दबा धरुन बसली असल्याची माहिती तपास पथक प्रमुख उपनिरीक्षक दिग्विजय चौगले यांना मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी यशस्वी छापा टाकून ६ आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्यापैकी पळून गेलेल्या तिघांनाही २४ तासात अटक केली. टोळक्याने पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

### भारताचे संविधान, साहित्य ग्रंथाचे पूजन



**पिंपरी :** फुले, शाहू, आंबेडकर एज्युकेशनल अँड सोशल फाऊंडेशनच्या वतीने थोर समाजसुधारक महात्मा फुले यांच्या १९८ व्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त महात्मा फुले चरित्र साधने साहित्य व प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासनाचे सदस्य विधीकर्ते सत्यशोधक रघुनाथ ढोक यांनी महात्मा फुले यांच्या वेशभूषेत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास हार घालून तसेच समाजसेविका उषा वाघमारे यांच्या हस्ते भारताचे संविधान, राष्ट्रीय ग्रंथाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सत्यशोधक रघुनाथ ढोक म्हणाले की, महापुरूषांचे विचार, वारसा आत्मसात करून घरातील व इतर विधी कार्य या पुढे सर्वसमाजाने सत्यशोधक पद्धतीने करणे आधुनिक काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उदगीर येथील सुभाष उडबाळे, लातूरचे बाबुराव वाघमारे, नांदेडचे अशोक गंगासागर, वडूजचे नितीनकुमार राऊत, सत्यनारायण कांबळे, पंढरपूरचे बँक ऑफ महाराष्ट्रचे मॅनेजर मनोज वाघमारे यांनी देखील मानवजातीचे शुभ विचार समोर मांडले. याप्रसंगी सुगंधा आणि नेमीनाथ जिर्गे यांच्या हस्ते रघुनाथ ढोक लिखित सावित्रीबाई फुले ग्रंथ भेट देण्यात आले.

# डॉ. सुश्रुत घैसास यांना पुणे पोलिसांकडून संरक्षण

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी पोलिसांकडे सुरक्षेची मागणी केली. आपल्या जीवाला धोका असल्याने पोलिसांनी सुरक्षा द्यावी अशी मागणी डॉक्टर घैसास यांनी केली. त्यानुसार सध्याचे वातावरण पाहता पुणे पोलिसांच्या पोलीस मुख्यालयातून एक पोलीस कर्मचारी डॉ. घैसास यांच्या सुरक्षेसाठी देण्यात आला आहे.



तनिषा भिसे प्रकरणात ससून रुग्णालयाने पुणे पोलिसांना आपला अहवाल सादर केला आहे. त्यामुळे आता डॉक्टर घैसास यांच्यावर पुणे पोलीस गुन्हा दाखल करणार का हे पहावे लागणार आहे. डॉ. सुश्रुत घैसास हे पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधील माजी स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. तनिषा ऊर्फ ईश्वरी भिसे यांच्यावर उपचार करण्यासाठी घैसास यांनी भिसे कुटुंबीयांकडे १० लाख रुपयांची मागणी केली होती, असा आरोप आहे.

तनिषा भिसे यांचा मृत्यू झाल्यानंतर दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे डॉक्टर घैसास यांनी राजीनामा दिला. दरम्यान, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये १० लाख रुपये अनामत रक्कम भरता न आल्याने भिसे कुटुंबीयांना दुसऱ्या रुग्णालयात जावे लागले. या सगळ्या गोष्टी घडताना तनिषा भिसे यांची प्रसूती झाली. त्यांनी जुळ्या मुलींना जन्मही दिला. पण प्रसूतीनंतर तनिषा भिसे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## लोहगावात नोंदवलं गेलं सर्वोच्च तापमान

**पुणे :** शहर आणि जिल्ह्यात यंदा उन्हाच्या तीव्र झळा सध्या जाणवत आहेत. पुण्यातील तापमानानं चक्क सर्वाधिक तापमान असलेल्या विदर्भालाही मागं टाकलं आहे. पुण्यातील लोहगावात सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, मध्य महाराष्ट्रासह मराठवाडा, विदर्भात उन्हामुळं लाही लाही होत आहे. राज्यातील सर्वाधिक तापमान विदर्भातील अकोला जिल्ह्यात नोंदवण्यात आलं आहे. यामध्ये अकोल्यात ४३.७ अंश तापमानाची नोंद झाली. तर ब्रह्मपुरी, चंद्रपूरमध्ये , यवतमाळमध्ये ४२.२, वाशिममध्ये ४१ अंश तर नागपूरमध्ये ४० अंश तापमानाची नोंद झाली आहे.दरम्यान, मध्य महाराष्ट्राचा विचार करता पुण्यातील लोहगावमध्ये ४३ अंश तापमानाची नोंद झाली आहे. हे पुणे जिल्ह्यातली आत्तापर्यंतच सर्वाधिक तापमान आहे. त्यामुळं पुणेकरांसाठी ही नक्कीच चिंतेची बाब आहे.

# पुणे-सातारा महामार्गावर खासगी व्होल्वो बसला आग

## चालकाच्या प्रसंगावधनामुळे जीवितहानी टळली

◆ पुणे (प्रतिनिधी) :

कोल्हापूरहून पुण्याकडे येणाऱ्या खासगी व्हॉल्वो बसने गुरुवारी कात्रज शिंदेवाडी पुलाजवळ अचानक पेट घेतला. प्रसंगावधान राखत चालकाने सर्व प्रवाशांना वेळीच बसमधून बाहेर काढल्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

अधिकच्या माहितीनुसार, कोल्हापूरवरून पुण्याकडे भरधाव वेगाने येणारी बस शिंदेवाडी पुलाजवळ आली असताना इंजिन भागातून धुर निघू लागला. काही क्षणांतच बसने आगीचा भडका घेतला. आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने तत्काळ बस थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले.



दरम्यान, प्रवाशांनी वेळीच बसमधून खाली उतरल्यानं कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र बस पूर्णपणे जळून खाक झाली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि आग आटोक्यात आणली. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक पोलिसांनी यासंदर्भात तपास सुरू केला असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा खासगी बस सेवांच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# अभियंता महिलेने बनविला अत्याधुनिक पाळणा

◆ पिंपरी (प्रतिनिधी):

बाळाला पूर्ण वेळ झोप मिळाली तर त्याची शारीरिक व बौद्धिक वाढ व्यवस्थित होते. प्रत्येक पालकांना आपल्या बाळाची उत्तम काळजी घेणे आवश्यक वाटते. परंतु आई-वडील दोघेही नोकरी व्यवसायात व्यस्त असताना बाळाच्या वाढीमध्ये अनेक समस्या उद्भवतात. या समस्या सोडवण्यासाठी क्रेडलवाइज कंपनीने एक अत्याधुनिक, तंत्रज्ञान युक्त, स्वयंचलित आधुनिक पाळणा तयार केला आहे म्हणजेच द. क्रेडलवाइज.



या पाळण्यात ठेवलेले बाळ जागे होऊन हालचाल करू लागले की, त्याची सूचना मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे पालकांना मिळते. बाळ रडण्यापूर्वीच पाळणा हळुवारपणे स्वयंचलित सुरक्षित झोके देण्यास सुरुवात करतो. त्याचे सर्व नियंत्रण दूरवरून मोबाईलद्वारे करता येते. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. यामुळे बाळाच्या झोपेत व्यत्यय निर्माण होत नाही. यामध्ये अत्याधुनिक कॅमेरे आणि सेन्सरचा वापर करण्यात आला आहे. या पाळण्याची सुरक्षाविषयक सर्व काळजी घेण्यात आलेली आहे. त्यामुळे या उत्पादनाला सुरक्षाविषयक अमेरिकेतील जेपीएमए (Juvenile Product Manufacturing Association) आणि ग्रीनगार्ड हे प्रमाणपत्र मिळाले आहे.

क्रेडलवाइज हे जगातील पहिले एआय स्वयंचलित स्मार्ट क्रीब तंत्रज्ञान आता भारतातील ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिले आहे अशी माहिती कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक किरण ब्याहटटी यांनी चिंचवड येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी क्रेडलवाईजचे उत्पादन व्यवस्थापक माधव आनंद, मनुष्यबळ संसाधन अधिकारी विशाल सातारकर व आशिष बंका, गुणवत्ता व्यवस्थापक ज्ञानेश्वर कोळगे, पुरवठा साखळी प्रमुख अनुप जोशी, वरिष्ठ लॉजिस्टिक प्रबंधक विनित प्रियदर्शी, मयूर मेश्राम, विश्वरंजन सामाल, हरीश आर., वाणी तडकापल्ली आदी उपस्थित होते.

# महानगरपालिकेने नागरिकांना दिले अग्निसुरक्षेचे धडे

◆ पिंपरी (प्रतिनिधी):

इमारतीच्या आठव्या मजल्यावर अचानकपणे लागलेली आग, स्थानिक रहिवांशाकडून आग विझवण्याचा केला जाणारा प्रयत्न, नागरिकांनी संपर्क करताच आग विझवण्यासाठी अवघ्या काही मिनिटात अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर मिळवलेले नियंत्रण असा थरारच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'मॉक ड्रिल'मध्ये पाहायला मिळाला.

भारतात दरवर्षी १४ एप्रिल ते २० एप्रिल हा आठवडा 'राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह' म्हणून पाळला जातो. महानगरपालिकेच्या वतीनेही या सप्ताहाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी मंगळवारी निगडी येथील शरदनगर व दुर्गानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, येथे अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना व मॉक ड्रीलचे आयोजन करण्यात आले होते. या मॉक ड्रीलमध्ये उंच



शिडीच्या साहाय्याने इमारतीतील अडकलेल्या नागरिकांचा यशस्वी बचाव करण्यात आला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांना आगीचे धोके ओळखणे, आग लागल्यानंतरचे योग्य पावले उचलणे, अग्निसुरक्षा उपकरणांचा योग्य वापर व आपत्कालीन प्रसंगी सुरक्षिततेच्या उपायांबाबत माहिती देण्यात आली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, अग्निशमन विभागाचे उप आयुक्त मनोज लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तळवडे उपकेंद्राचे उप अग्निशमन अधिकारी बाळासाहेब वैद्य यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या मॉक ड्रील मध्ये अग्निशमन विभागाचे चंद्रशेखर घुले, विकास तोडरमल, लीडिंग फायरमन शाहू व्हनमाने, नितीन कोकरे, विशाल बाणेकर यांच्यासह एकूण ३२ अग्निशमन जवान सहभागी झाले होते.

# चितळे बंधूंच्या नावाने वर्षभर बनावट बाकरवडीची विक्री

## ग्राहकांच्या तक्रारीनंतर झाले उघड

◆ पुणे (प्रतिनिधी) :

बाकरवडीसाठी गेल्या काही दशकापासून प्रसिद्ध असलेल्या चितळे बंधू मिठाईवाले यांच्या नावाने तब्बल एक वर्षांपासून बनावट बाकरवडी विकली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

याबाबत चितळे बंधू मिठाईवाले यांच्याकडून नितिन दळवी यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून चितळे स्वीट होमचे मालक प्रमोद प्रभाकर चितळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार सुमारे एक वर्षांपासून सुरु होता.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून चितळे बंधू मिठाईवाले यांना बाकरवडीची चव बदल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत फिर्यादी यांनी बाजारात मिळणाऱ्या काही ठिकाणाहून चितळे स्वीट होम नावाने विक्रीस असणाऱ्या बाकरवडीची पाकिटे खरेदी केली. चितळे स्वीट होम नावाने असणारी बाकरवडीची पाकिटे आणि चितळे बंधुच्या नियमित तयार होणाऱ्या बाकरवडीच्या पाकिटांमध्ये तफावत दिसून आली. तसेच त्या पाकिटावर चितळे बंधू मिठाईवाले यांचे अधिकृत ई मेल आयडी, कस्टमर केअर नंबर व वेबसाईट हे पाकिटांच्या साईड पट्टीवर हुबेहुब छापले असल्याचे दिसून आले. चितळे बंधू मिठाईवाले यांच्या नावाचा गैरवापर करून आर्थिक नुकसान करून चितळे बंधू मिठाईवाले यांची फसवणूक केल्याचे समोर आलं आहे.

चितळे स्वीट होमचे मालक आणि चितळे बंधू मिठाईवाले यांचा काहीही नातेसंबंध नाही. चितळे स्वीट होमचे प्रमोद चितळे यांचे नागनाथ पार येथे दुकान आहे. गेल्या एक वर्षांपासून त्यांनी बनावट बाकरवडी तयार करून चितळे बंधुच्या नावाचा वापर करीत असल्याचे आढळून आल्याने आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार करण्यात आली होती, असे फिर्यादी नितीन दळवी यांनी सांगितले.

इंद्रनिल चितळे यांनी ग्राहकांना आवाहन केले आहे की, चितळेचे कोणतेही उत्पादन घेताना ते खरे आहे की बनावट हे त्या उत्पादनावर असलेल्या माहितीच्या आधारे तपासावे.

## मिलिंद देशमुख यांचा जामीनासाठी अर्ज

**पुणे :** गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतील एक कोटी ४२ लाख रुपयांचा निधी नियमबाह्य पद्धतीने वळविण्यात आल्याच्या आरोपावरून येरवडा कारागृहात असलेले भारत सेवक समाज संस्थेचे सचिव मिलिंद देशमुख यांनी जामीन मिळविण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. एक कोटी ४२ लाख रुपयांचा निधीची रक्कम आपल्या खात्यात हस्तांतरित करण्यात आली नाही, तसेच अपहार केला नाही. सोसायटीचे लेखापरीक्षण अहवाल धर्मादाय आयुक्त कार्यालयाने मंजूर केले आहेत. त्यामुळे देशमुख यांच्याविरुद्ध फसवणूक, विश्वासघात अशी कलमे लागू होत नाहीत,' असा युक्तिवाद मिलिंद देशमुख यांच्या वकील ॲड. उज्ज्वला पवार यांनी केला.

# 'दिल्लीच्या तख्तावर महाराष्ट्राची पकड घट्ट होणार'

◆ पुणे (प्रतिनिधी):

मराठी भाषेची ओळख कधीच पुसली जाणार नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देणे हा एकच ध्यास घेवून महाराष्ट्र साहित्य परिषदेसह सर्वांनी प्रयत्न केले. दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वी केले याचे कौतुक आहे. महाराष्ट्र आता मागे वळून पाहणार नाही. दिल्लीच्या तख्तावर महाराष्ट्राची पकड घट्ट झालेली पहायला मिळेल, असा विश्वास महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केला. ९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्याचा मान साताऱ्यास मिळावा, अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

सरहद, पुणे आयोजित ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार आणि उद्घाटक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावर आधारित 'मु. पो. तालकटोरा' या पुस्तकाचे प्रकाशन तसेच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या मसापच्या कार्यकर्त्यांचा सत्कार मंत्री भोसले यांच्या हस्ते गुरूवारी करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी दिल्ली येथे शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले होते. या निमित्त त्यांचा सन्मान प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते करण्यात आला.

पुणे लघु प्रशिक्षण केंद्राकडून २८६ टक्के उद्दिष्ट पूर्ण

# महावितरणचे 'पुणे परिमंडल' सलग तिसऱ्यांदा अव्वल

◆ पुणे (प्रतिनिधी):

महावितरणच्या पुणे परिमंडल लघु प्रशिक्षण केंद्राने सन २०२४-२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सलग तिसऱ्या वर्षीही राज्यातील प्रथम क्रमांक कायम ठेवला आहे. पुणे परिमंडलातील ६ हजार ८५८ अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण वर्गांसह विद्युत अभियांत्रिकीच्या ९ हजार ५०० विद्यार्थांसह १ लाख २६ हजार शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध एजन्सीजचे कर्मचारी व नागरिकांसाठी प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रबोधन व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.





महावितरणच्या राज्यभरातील २५ लघु प्रशिक्षण केंद्रांतून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. गेल्या आर्थिक वर्षांत पुणे लघु प्रशिक्षण केंद्राने तब्बल २८६ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले. त्यानुसार नाशिक येथील महावितरणच्या मुख्य प्रशिक्षण व सुरक्षा विभागाने जाहीर केलेल्या मानांकनात पुणे परिमंडलाचे लघु प्रशिक्षण केंद्र सलग तिसऱ्या वर्षी राज्यात प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहे.

पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी कर्मचाऱ्यांचे ज्ञान, कौशल्ये व क्षमता वाढीसाठी प्रशिक्षण व कार्यशाळांवर भर दिला आहे. यासाठी मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रेय बनसोडे (नाशिक) यांचेही महत्वाचे सहकार्य मिळाले. लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी यांनी गेल्या आर्थिक वर्षात १०५ प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केले. यात अभियंते, अधिकारी, नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी, तांत्रिक कर्मचारी, अप्रेंटीस, विविध एजन्सीचे कर्मचारी अशा ६ हजार ८५८ जणांना प्रामुख्याने सौर ऊर्जेसह विद्युत सुरक्षा, उपकेंद्र व वितरण यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती, ॲडव्हान्स मीटरींग इन्फ्रास्ट्रक्चर, सौर ऊर्जा, विद्युत वाहने, वीजचोरी रोखण्याच्या उपाययोजना, प्रथमोपचार, ताणतणाव व्यवस्थापन, वीजबिलांचे अचूक बिलींग आदींवर प्रशिक्षण देण्यात आले. यासोबतच जार ५०० विद्यार्थांशी थेट संवाद साधून वीजक्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व घडामोडी, वीजसुरक्षा व डिजिटल ग्राहकसेवा आदींबाबत 'नॉलेज शेअरींग' करण्यात येत आहे. तसेच घरगुती व सार्वजनिक वीजसुरक्षा, डिजिटल ग्राहकसेवा, वीजबचत आदींबाबत मेळावे, कार्यशाळाद्वारे प्रबोधन करण्यात आले.

# 'अभिरूप न्यायालय' स्पर्धेत विधी महाविद्यालय ठरले उपविजेते

◆ पुणे (प्रतिनिधी) :

श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या विधी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज सहावी राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेत पनवेल येथील भागुबाई चंगू ठाकूर विधी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले, तर पुण्याच्या शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळवले. युगा कुमारी (श्री शिवाजी मराठा विधी महाविद्यालय) हिला सर्वोत्कृष्ट प्रतिवादी वकील तर श्रुती चौबे (भागुबाई चंगू ठाकूर महाविद्यालय) हिला सर्वोत्कृष्ट वादी वकील म्हणून गौरवण्यात आले. ही स्पर्धा शुक्रवार पेठेतील संस्थेच्या सभागृहात पार पडली.





वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण हे २५ ते ३० वर्षांपूर्वी जास्त प्रमाणात घेतले जात होते. मात्र, आता कायद्याच्या शिक्षणाकडे देखील वैद्यकीय आणि अभियांत्रिकीप्रमाणे पाहिले जात आहे. दररोज नवीन गोष्टी या क्षेत्रात शिकायला मिळत असून आपापल्या तालुक्यात व गावी जाऊन काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना आहे, असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संदीप मारणे यांनी यावेळी व्यक्त केले.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, सुमंतराव कोल्हे, बार कौन्सिलचे उपाध्यक्ष ॲड. अहमदखान पठाण आणि सोसायटीचे उपाध्यक्ष राजेंद्र जगताप यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# कासलेची पोलीस दलातून हकालपट्टी

चर्चा

## आरोपांवर काय कारवाई होणार?

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:सायबर विभागातील निलंबित पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याची अखेर पोलीस खात्यातून बडतर्फी झाली असून, या कारवाईमुळे महाराष्ट्र पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे. रणजीत कासले याने गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावरून थेट धनंजय मुंडे, वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत अनेक व्हिडीओ व्हायरल केले होते. त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला कारवाई करावी लागली.दरम्यान छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे माननीय पोलीस महानिरीक्षक यांनी कलम ३११(२)(ब) अंतर्गत रणजीत कासले यांना बडतर्फ केल्याचे अधिकृतरित्या जाहीर करण्यात आले. रणजीत कासले याने सोशल मीडियावर व्हायरल केलेल्या एका व्हिडीओमध्ये असा दावा केला की, बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड याच्या 'बोगस एन्काउंटर'ची ऑफर मिळाली होती. यामुळे पोलीस यंत्रणेवर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित व्हिडीओंनी मोठा राजकीय आणि सामाजिक वाद निर्माण केला.



### गुन्ह्यांची नोंद आणि अटकेची कारवाई

आज १८ एप्रिल २०२५ रोजी बीड पोलिसांनी रणजीत कासले याला अटक केली.त्याच्यावर शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक २१३/२५ अंतर्गत एससी/एसटी अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (१) (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कलमाअंतर्गत अनुसूचित जाती व जमातींवरील अपमानकारक वागणुकीसाठी कडक शिक्षा होऊ शकते.

### कासलेच्या आरोपांकडे गांभीर्याने पाहिले जाईल का?

रणजीत कासले याचे आरोप केवळ वैयक्तिक पातळीवर नसून ते संपूर्ण पोलीस व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. त्यांच्या आरोपांची चौकशी होणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जर ते आरोप सत्य असल्याचे सिद्ध झाले, तर बडतर्फी ही एक बाजू ठरेल आणि पोलीस दलाला मोठा धक्का बसू शकतो. कासले याच्या व्हिडीओंना समाजमाध्यमांवर संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. काहींनी त्यांच्या धाडसाची प्रशंसा केली, तर काहींनी त्यांना पोलिस दलाच्या प्रतिमेला धक्का पोहोचवणारा म्हटले.

# बुद्ध जगातले पहिले वैज्ञानिक

## भदंत मुतितानंद थेरो:परळीत जयभिम महोत्सव



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४ व्या जयंती निमित् परळी शहरात ''परळी भिमजयंती महोत्सव'' दि १६ एप्रील पासून येथील डॉ आंबेडकर पुतळा, रेल्वे स्टेशन मैदान येथे सुरु आहे

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी परभणी येथील भदंत मुतितानंद थेरो, यांचे ''बुद्धाला ज्ञान प्राप्ती झाली म्हणजे नेमके काय झाले?'' या विषयावर जाहिर धम्मप्रवचन आयोजित करण्यात आले होते. आपल्या धम्मदेसनेत भंतेजी म्हणाले की, बुद्ध हे जगातील पहिले मनाचे(चळपव) वैज्ञानिक होऊन गेले, ज्यांनी मानवाच्या दुःखाचे कारण शोधले व त्यावर उपाय सुद्धा सांगितला. तृष्णा हे दुःखाचे कारण तर दहा पारमिता त्यावरिल उपाय सांगितला. बुद्धाच्या ज्ञान ज्ञान प्राप्ती मध्ये संशोधन आहे, चमत्कार वगैरे काही नाही असेही भंतेजीनी सांगितले

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सुकाणू समितीचे प्रा दासू पान २ वर

# ...म्हणून विमा मिळण्यास वेळ लागणार!

## वसंत मुंडे:माजी कृषि मंत्र्यांनी टक्केवारी घेतल्याचा आरोप

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:केंद्र व राज्यातील आरएसएसच्या विचारधारेचे भाजप व मित्र पक्षाच्या महाराष्ट्रातील तिन्ही माझी कृषिमंत्र्यांनी खाजगी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे न्यायालयाचे व शासनाचे आदेश असूनही शेतकऱ्याला २०२० पासून २०२५ पर्यंतचा पिक विमा शेतकऱ्यांना मिळण्यास वेळ लागणार असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. केंद्रातील भाजपच्या सरकारने २०१६ पासून शासनाच्या पिक विमा कंपन्या संदर्भातली संपूर्ण काम खाजगी कंपन्याला देऊन टाकले असून त्यामध्ये खाजगी कंपन्यांनी १० हजार कोटी पेक्षा जास्त मोठा घोटाळा शेतकऱ्याचे पिक विमा मध्ये केलेला आहे. खाजगी पिक विमा कंपनीवर न्यायालयाचे आदेश असूनही नियमानुसार कारवाई केली जात नाही .त्याचे कारण आजी माजी कृषिमंत्र्यांना पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी दिली गेलेली आहे. त्यामुळे राज्यातील त्रिमूर्ती सरकारकडून पिक विमा कंपन्या काळ्या यादीत टाकण्यासंदर्भात कारवाई केली जात नाही असा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केला आहे. कृषी विभागाचे प्रधान सचिव यांनी भाजप व आर एस एस च्या केंद्रा सरकारकडे चार वेळेस पत्र व्यवहार केलेला आहे पण शेतकऱ्यांना पिक विमा देणे संदर्भात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत. प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिके पेरणी पासून काढणे पर्यंतचा कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे नैसर्गिक गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ पाऊस कमी पडल्याने शेतीचे उत्पन्नावर परिणाम होतो. पिक विमा संदर्भात शेतकऱ्याचे अनेक प्रकरणे राज्य सरकार मा. तालुका न्यायालय , जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात खाजगी पिक विमा कंपनीच्या व सरकारच्या विरोधात चालू आहेत, खाजगी पिक विमा कंपन्या बाबत आजतागायत शेतकऱ्यासाठी शासनाकडून कोणताही निर्णय दिला नसल्यामुळे पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होत नाहीत. कारण राज्यातील सर्वच आजी–माजी कृषीमंत्र्यांना टक्केवारी खाजगी विमा कंपन्याकडून घेतली आहे . सरकारकडून २० ते ३५ टक्के खाजगी पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. त्रिमूर्ती सरकारने १ रुपयात पिक विमा भरण्या संदर्भात शेतकऱ्याला लोभ दाखवून शेतकऱ्याची खूप मोठ्या प्रमाणावर दिशाभूल केली . शेतकऱ्याचा टक्केवारीचा हिस्सा, केंद्र व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून पीक विम्याचे विविध निकषाचे नुकसान भरपाई संदर्भात पालन करून टक्केवारीनुसार वेगवेगळ्या पिकाचा पिक विमा शेतकऱ्याला दिला जातो. त्यामध्ये खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी यांच्यासोबत तोडजोड करून लोकप्रतिनिधी व कृषी मंत्री कृषी आयुक्त सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर आर्थिक तोडजोड करून शेतकऱ्याला पिक विमा वाटप न होऊ देण्याचे खरे कारण टक्केवारी असल्याचा आरोप काँग्रेसचे पान २ वर

# व्यंकटेश बालाजी मंदिराचा जीर्णोद्धार

## अध्यात्मिक:प्राणप्रतिष्ठा निमित्त विविध कार्यक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब: व्यंकटेश बालाजी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून या नवीन मंदिरात श्री व्यंकटेश बालाजी मूर्ती स्थापना व प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाला गुरुवार दिनांक १७ एप्रिल रोजी सुरुवात झाली असून यानिमित्त कळंब शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली यात उंट व घोडेस्वार तसेच श्री व्यंकटेश बालाजी भक्त यांचा मोठा सहभाग होता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री व्यंकटेश बालाजी मूर्ती व देवतांच्या मूर्ती यांच्यावर तसेच बाल वारकरी यांच्यावर जेसीबी मधून फुले उधळण्यात आली चौकात वारकरी संस्थेतील विद्यार्थ्यांनी झेंडा हातात घेऊन भजन गायन करत नृत्य केले मिरवणूक अहिल्याबाई होळकर चौक मेन रोड कळंब कथले चौक मार्गे श्री व्यंकटेश बालाजी मंदिर येथे पोहोचली मंदिराचा जीर्णो द्धार श्री व्यंकटेश बालाजी मूर्ती स्थापना व प्राणप्रतिष्ठा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कळंब शहराच्या पावन भूमीमध्ये दीडशे वर्षा पुरातन श्रीव्यंकटेश बालाजी मंदिर असून श्री बालाजी मंदिर देवस्थान ट्रस्ट व कळंब येथील श्री बालाजी भक्तगण यांच्यावतीने मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून यानिमित्त देवस्थान मध्ये श्री वेंकटेश बालाजी, श्री गणेश, श्री राम दरबार, श्री हनुमान ,श्री महादेव ,श्री शनिदेव, श्री गरुड, श्री जय विजय, यांच्या पावन मूर्तीची स्थापना व प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दिनांक १७ एप्रिल रोजी कळंब शहरातून भव्य श्री मूर्ती व कलश शोभायात्रा काढण्यात आली शुक्रवार दिनांक १८ एप्रिल विश्वसेन आराधना, पुण्याहवाचन, मूर्ती मृतिका संग्रहण, अंकुरारोपण ,अग्निप्रतिष्ठा, मूलमंत्र, मूर्तीमंत्र ,जलाधिवास पंचांग व्याथिवास, संगीतमय सुंदर कांड पाठ श्री कमलेशजी वर्मा (छत्रपती संभाजीनगर ) आपल्या मधुर वाणीतून व्यक्त होतील शनिवार दिनांक १९ एप्रिल सांस्कृतिक कार्यक्रम तसेच रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी पावन मूर्ती प्राणप्रतिष्ठा पान २ वर

# आबासाहेब खिलारेंना पुरस्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:राज्य सरकारकडून देण्यात येणारे राज्यस्तरिय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहिर झाले असून, यामध्ये कडा येथील ग्रामविकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांना यावर्षीचा आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील ग्रामविकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांना उत्कृष्ट कार्याबद्दल छत्रपती संभाजीनगर विभागातून यावर्षीचा आदर्श ग्रामपंचायत अधिकारी हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल खिलारे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# नवोदय विद्यालयासाठी मोफत कार्यशाळा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे नवोदय विद्यालय प्रवेश पात्रतेसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेकरिता मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा अचीवमन्ट अॅकॅडमी, गिराम नगर , पांगरी रोड बीड येथे रविवार दि. २० एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता आयोजित केली आहे. या कार्यशाळेत नवोदय विद्यालयासाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेतील सर्व घटक विषयासह इयत्ता पाचवी स्कॉलरशिप परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने निर्धारित केलेल्या सर्व विषयांचे विविध स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तके लिहिणारे लेखक डॉ. नंदकुमार उघाडे यांच्यासह तज्ञ व अनुभवी प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. तरी इयत्ता चौथीची परीक्षा देऊन पाचवीत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी संस्थेचे सचिव डॉ . नंदकुमार उघाडे ( ८७६६८६९०८२) यांच्याशी संपर्क साधून या मोफत कार्यशाळेचा लाभ घ्यावा . असे आवाहन करण्यात आले आहे.

# लोणार सरोवर येथे वारसादिन

## धोरण: नियोजनानात्मक राबविले उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:पुरातत्व विभागाचे शुभम अर्जरिया यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते या वेळी मी लोणारकर टीम चे सचिन कापुरे, शैलेश सदार, रमेश राठोड यांनी वारसा स्थळांबद्दल पर्यटकांना संबोधित केले निसर्ग मल्टिपर्पज चे सर्पमित्र विनय कुलकर्णी व महाराणा प्रताप हाइस्कूल चे शेटे सर यांनी मुलान मार्गदर्शन केले जालना येथील राजगुरू स्वामी यांनी मंदिरांचे महत्व मांडले या नंतर स्वच्छतामोहिम घेण्यात आली तसेच हेरिटेज वॉक चे आयोजन झाले या कार्यक्रमात अनेक मान्यवरानी सहभाग घेतला .

दरवर्षी १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन किंवा स्मारके आणि स्थळांसाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय स्मारके आणि स्थळे परिषद या दिवशी सांस्कृतिक वारसा आणि जगातील विविध स्मारके आणि वारसा स्थळांना प्रोत्साहन देते. या दिवसाचे उद्दिष्ट जगातील वारसा स्थळांच्या विविधतेबद्दल आणि त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांबद्दल शिक्षित करणे आहे.

# 'युवा संघर्ष निर्धार' परिषद

## डॉ.शेंडगे:युवकांनी उपस्थित राहवे

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जाणकर, माजी खा. राजू शेट्टीसह आ.बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२० एप्रिल रोजी येथील फुलेवाडा येथे युवा संघर्ष निर्धार परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेस युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे. असे आवाहन रासप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. शिवाजी शेंडगे यांनी केले आहे.

याबाबत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. शेंडगे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, विद्यमान राज्य सरकारला निवडणुकीनंतर जनतेला दिलेल्या आश्वासनांचा विसर पडला आहे. शेतक–यांची कर्जमाफी, शेतमाल हमीभाव, बेरोजगारी, घरगुती गॅस दरवाढ, महागाई, यासारख्या सर्वसामान्य जनतेच्या निगडीत प्रश्नांना दुर्लक्षित करुन फसव्या घोषणा करणारे भाजपा सरकार केवळ जातीपातीचे गलिच्छ राजकारण करुन मुळ प्रश्नांकडे डोळेझाक करीत आहे. राज्यात फोडाफोडीचे राजकारण करुन विरोधीपक्ष संपविण्याचे काम करीत आहेत.

निवड

## जिल्हा अध्यक्षपदी मस्के तर सचिवपदी चिंचाणे

# एसएफआयचे अधिवेशन उत्साहात

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)चे ४४वे बीड जिल्हा अधिवेशन शुक्रवारी दिनांक १८ एप्रिल रोजी माजलगाव येथे संपन्न झाले. अधिवेशनाची सुरुवात एसएफआयचे ध्वज फडकावून आणि शहीद भगतसिंग यांना अभिवादन करून झाली. एसएफआयचे राज्य अध्यक्ष सोमनाथ निर्मळ यांनी केले. अधिवेशनात राज्य सचिव रोहिदास जाधव, राज्य उपाध्यक्ष भास्कर म्हसे यांनी मार्गदर्शन केले. तसेच किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष ॲड. अजय बुरांडे व डीवायएफआयचे जिल्हा अध्यक्ष विशाल देशमुख यांनी अधिवेशनास शुभेच्छा दिल्या. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष कॉम्रेड मुसद्दीक बाबा सर हे होते तर उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अध्यक्ष लहू खारगे हे होते. अधिवेशनास बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, माजलगाव, परळी, वडवणी, धारूर, गेवराई, बीड व इतर सर्व तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालय आणि इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिवेशनाच्या प्रतिनिधी सत्रात संघटनेचा कार्यात्मक, संघटनात्मक, आंदोलनात्मक आणि शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणारा अहवाल मांडण्यात आला. यावर अधिवेशनातील प्रतिनिधींनी चर्चा केली. त्याआधी शोक ठराव मांडण्यात आला. अधिवेशनात वेगवेगळे ठराव पारित करण्यात आले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० रद्द करा, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती, स्वाधार आणि फेलोशिपचे त्वरित करा तसेच महागाई नुसार त्यात वाढ करा, ऊसतोडणी कामगारांच्या पाल्यांसाठी घोषित केलेली सरकारी वसतिगृहांची प्रभावी अंमलबजावणी करा, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नियमित बससेवा मिळण्याची हमी द्या, शासकीय आयटीआयचे खाजगीकरण थांबवा, जिल्हा परिषदेच्या पान २ वर

# केजमध्ये कृषी विद्यालय सुरु करावे

## मागणी:तहसीलदार यांना देण्यात आले निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: येथे फलोत्पादन खात्याच्या जागेवर कृषी विद्यालय सुरू करा,मराठवाडा जनता विकास परिषदेची मागणी केज शहरालगत असलेल्या फलोत्पादनच्या जागेत अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केज शहरात कृषी विद्यालयाची गरज आहे. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. कृषी शिक्षणानंतर आधुनिक तंत्रज्ञान शेतीसाठी या शिक्षितांचा उपयोग शेतीसाठी होणार आहे खेडेगावातील विद्यार्थ्यांसाठी कृषी विद्यालय अत्यावश्यक आहे फलोत्पादनच्या जागेत कृषी विद्यालय सुरू करण्यात पान २ वर